# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३७**

358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा



ाचवे / अंक १ / जुलै २०००

# संपादकीय

## बेचैन मन !


नवीन वर्षाचा हा पहिलाच अंक सादर करतांना मनांत संमिश्र भावनांची गर्दी उठली आहे. तसे हे 'दिशा' चे पाचवे वर्ष. म्हणजे त्या दृष्टीने एकप्रकारे हा या नियतकालिकाचा वाढदिवसच. 'दिशा' ने यंदा चार वर्षे पुरी केली असून त्याला आता या अंकापासून सरकारमान्य लोकाश्रय प्राप्त झाला आहे. थोडक्यात पब्लिकेशन अॅक्ट प्रमाणे त्याचे रजिस्ट्रेशन होऊन 'व्ही.पी.एम्. दिशा' या नावाने हा पहिला अंक आपल्याला सादर करण्यात आम्हाला आनंद होत आहे. या रजिस्ट्रेशन कार्यवाही साठी संपूर्ण मदत करणाऱ्या अॅडव्होकेट श्री. सलील बुटाला यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. सर्व रजिस्ट्रेशन खर्च, ज्यांत दिल्ली प्रवासाचा सुद्धा समावेश आहे तो सर्व खर्च सामाजिक बांधिलकीच्या नात्याने त्यांनी स्वतः सोसला आहे. एवढे एकच मोठेपण दाखवून देणारे त्यांचे कृत्य या अॅडव्होकेटची ओळख होण्यास पुरेसे आहे.

रजिस्ट्रेशनमुळे आमच्या जबाबदाऱ्याही वाढल्या आहेत व त्या दृष्टीने अंक वेळेवर काढणे व त्यात चुका नसणे या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. याची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्यासाठी संपादकांसह पाच लोकांचे मंडळ, जे दूरध्वनीने तात्काळ भेटून निर्णय घेऊ शकते. अशा मंडळाची संपादकीय सल्लागार मंडळातील प्रतिनिधींमधून निवड करून पुढील कारभार केला जाईल. मात्र इतर विभागीय प्रतिनिधीही पूर्वीसारखेच आपल्या विभागाचे काम पहातील.

हे संपादकीय लिहीताना महाराष्ट्राचे लाडके विलोभनीय व्यक्तिमत्त्व पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांच्या १२ जून रोजी झालेल्या दुःखद निधनाचे सावट मनावर आहे. चार दशके मराठी मनाला आपल्या साहित्य कलाभूषणांनी हसवत ठेवणाऱ्या खेळियाला विसरणे अशक्यच आहे. त्यांच्या प्रकृतीत होणाऱ्या चढ उताराकडे गेल्या चार पाच दिवसात अक्षरशः सर्व मराठी माणसे डोळे लावून बसली होती व येणाऱ्या बातम्या ऐकून निरुत्साही होत होती. पण शेवटी नियतीने डाव साधला. देवाने आपल्या दरबारातील मानकऱ्यांचे मनोरंजन करण्यासाठी या पृथ्वीलोकावरील खेळियाला आपल्या लोकात नेले. गेली सहा वर्षे पु.ल. हे स्वतः कोणत्याही कार्यक्रमात नसले तरी त्यांचे जाणे हे सर्वांना चटका लावून गेले.

(पान क्र. १० वर)

व्ही. पी. एम्.



# दिशा

वर्ष पाचवे / अंक १ / जुलै २०००

**संपादक**
श्री. अचलकुमार टिब्रू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर
**कायदेविषयक सल्लागार**
अॅड. सलील बुटाला
**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२७०
**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्ट्स,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिब्रू | |
| २) | माहिती तंत्रज्ञान : स्वयंरोजगाराच्या नव्या दिशा | श्री. प्रवीण प्रधान | ३ |
| ३) | शिक्षणात ज्ञानापेक्षा माध्यमाचेच वर्चस्व अधिक | श्री. प्रदीप कर्णिक | ७ |
| ४) | मी पाहिलेली इटाली ! (उत्तरार्ध) | डॉ. ग. त्रिं. दाभाडे | ११ |
| ५) | सरत्या शतकातील महान व्यक्ती | कु. शिल्पा पाटील | २१ |
| ६) | लग्न नावाचा धडा | श्री. प्रवीण दामले | २३ |
| ७) | जरा विचार करा | सौ. मंजिरी दांडेकर | ३१ |
| ८) | जमाना ई-कॉमर्सचा | श्री. मुंजे | ३३ |
| ९) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ३६ |

सुविचार संकलन : श्री. यतीन ओक

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

जीवनात कधीही दुःखाचा पाठलाग करू नका.

# माहिती तंत्रज्ञान : स्वयंरोजगाराच्या नव्या दिशा

**श्री. प्रवीण प्रधान**

*(संगणक आल्यामुळे नोकऱ्या कमी झाल्या असे म्हणतानाच माहिती तंत्रज्ञानामुळे व्यवसायाची क्षितिजे दृग्गोचर होऊ लागली. अशा काही नवीन क्षेत्रांबद्दल या लेखात चर्चा आहे. - संपादक)*

डॉ. बात्रा या अर्थशास्त्रज्ञाने फार पूर्वी भाकित केले होते की, '१९९० ते २००० या शतकातील शेवटच्या दशकात जागतिक अर्थव्यवस्था ढासळेल व सेवा व्यवसायाला (सर्व्हिस इंडस्ट्री) महत्त्व प्राप्त होईल आणि तेच व्यवसाय मंदी काळात टिकून रहातील.' सध्याची मंदीची जागतिक आर्थिक परिस्थिती पहाता त्याचे प्रत्यंतर आता येऊ लागले आहे. या मंदीच्या काळातसुद्धा काही सेवाउद्योग आर्थिकदृष्ट्या अत्यंत फायदेशीर ठरले आहेत व ते म्हणजे फास्ट फूडस्, मोटर/स्कूटर रिपेरींग, माहिती तंत्रज्ञानसेवा इ. या सेवाउद्योगात माहिती तंत्रज्ञान व्यवसायाचे (इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी) स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिसेस कंपनीज (नासकॉम) या माहिती तंत्रज्ञानाच्या अग्रगण्य संस्थेच्या अंदाजानुसार आगामी २१व्या शतकात या उद्योगात भारतात २००२-२००८ या काळात दरवर्षी दीड लाख माहिती तंत्रज्ञांची जरूरी भासणार आहे. मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या १,८३२ शासकीय व खाजगी माहिती तंत्रज्ञानाच्या शिक्षण संस्थेमधून दरवर्षी फक्त ६८,००० प्रशिक्षित तयार होतात! तज्ज्ञांच्या अंदाजानुसार झपाट्याने विकसित होत असलेल्या या क्षेत्रात २०२० सालापर्यंत भरपूर संधी उपलब्ध असतील. या गोष्टींचा विचार करून मराठी युवकांनी या अत्याधुनिक क्षेत्रात स्वतंत्र व्यवसाय करून पाय रोवावे असे सुचवावेसे वाटते.

साधारणपणे मराठी युवक व त्यांचे पालक स्वतंत्र व्यवसाय करण्यास साशंक असतात. कारण एक, त्यांच्या कुटुंबात किंवा समाजात स्वतंत्र व्यवसायाची परंपरा नसल्याने त्यांची त्या दृष्टीने मानसिक तयारी नसते. दोन, भरपूर पैसा असला तरच स्वयंरोजगार करता येतो असा (गैर) समज. तीन, नोकरीत असणारे स्थैर्य व नियमित मिळकत उद्योजकाला नसते असा ग्रह. पण मग किर्लोस्कर, गरवारे या उद्योगपतींकडेसुद्धा स्वतंत्र उद्योगाची परंपरा नव्हती तसेच संपत्तीसुद्धा नव्हती हे विसरून चालणार नाही. कॉम्प्युटरमुळे तसेच अलिकडील औद्योगिक जागतिक परिस्थितीमुळे नोकऱ्यांचे प्रमाण तर कमी होत आहेच. शिवाय असलेल्या नोकऱ्या टिकवण्याची शाश्वतीसुद्धा नसते. आत्मविश्वासाने उद्योगक्षेत्रात धडाडीने पाऊल टाकून त्यात यशस्वी झालेल्या उद्योजकांचा अनुभव आहे की, लहान वयात धडाडी असते, उमेद असते तेव्हाच स्वतःचा उद्योग सुरू करावा. जबाबदाऱ्या वाढण्यापूर्वी व्यवसायात धडक मारण सोपे असते. मुख्य म्हणजे, पालकांच प्रोत्साहन या काळात अत्यंत जरूरीचे असते. त्या दृष्टीने पालकांनी १०वी किंवा १२वी नंतर म्हणजे त्यांचे शालेय शिक्षण पुरे होण्यापूर्वी, आपल्या मुलांसाठी स्वतंत्र उद्योगव्यवसायाचा विचार करावा. मराठी युवकात असलेल्या उपजत बुद्धिमत्ता, जिद्द व मेहनती वृत्तीला जर इंग्रजी भाषेची आणि धडाडीची जोड दिली व छोट्या प्रमाणावर व्यवसाय सुरू करून त्याचे स्वरूप वाढवल्यास आर्थिक ताण कमी पडून त्यांच्या व्यवसायाची निश्चित भरभराट होईल. १०वी व १२वीत कमी गुण मिळवून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी किंवा नापास होणारे विद्यार्थी जिद्द व धडाडीच्या जोरावर त्यांच्या पुढील आयुष्यात खूप यशस्वी झालेले दिसतात. आगामी २१व्या शतकात माहिती तंत्रज्ञानव्यवसायात भरपूर मागणी पण अपुरे शिक्षित मनुष्यबळ असे आशादायक चित्र असल्याने स्वतंत्र व्यवसायाच्या दृष्टीने ते अत्यंत लाभदायक आहे.

---

तुम्ही दररोज मरत नाही काय ?

इंडियन इंस्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, बंगलोर या संस्थेचे संचालक प्रा. सदगोपान यांच्या मते आगामी शतकाच्या माहिती तंत्रज्ञानक्षेत्रातील व्यावसायिक गरज तीन भागात असेल. एक कॉम्प्युटर व टेलिकम्युनिकेशन क्षेत्रांतील प्रथमावस्था म्हणजे कॉम्प्युटर व संबंधित उपकरणांची बांधणी, जुळणी, दुरुस्ती, निगा(कॉम्प्युटर हार्डवेअर), इंटरनेट तंत्रज्ञ, टेलिकम्युनिकेशन उपकरणे व त्यांचे तंत्रज्ञ, सॉफ्टवेअर डेव्हलपर, इ. या करता नवोदितांना शैक्षणिक व खाजगी संस्थांमध्ये कॉम्प्युटर, टेलिकम्युनिकेशन व त्यांचे तंत्रज्ञ, सॉफ्टवेअर, इंटरनेट या माहिती तंत्रज्ञानातील शाखांचे व्यावसायिक प्रशिक्षण दिल जाते. दोन, माहिती तंत्रज्ञानातील अत्याधुनिक उपकरण, सॉफ्टवेअर विकसित करणे याकरता आय.आय.टी. तसेच इतर शैक्षणिक संस्थामधील पदवीधरांची जरुरी असेल. आणि तीन, कॅड/कॅम, व्हि.एल.एस.आय. आदींकरता अतिउच्च प्रकारचे सॉफ्टवेअर डेव्हलप करणाऱ्या तंत्रज्ञांची गरज भासणार आहे. हे प्रशिक्षण टाटा इन्फोटेक, विप्रोसारख्या माहिती तंत्रज्ञानातील अग्रगण्य संस्थामध्ये मिळू शकेल.

या लेखात वरील तीन शाखांपैकी फक्त पहिल्या शाखेचा १०वी/१२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या स्वयंरोजगाराच्या दृष्टीने विचार करण्यात आला आहे.

**माहिती तंत्रज्ञान (इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी)**

सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स कॉम्प्युटींग (C-DAC) ही केंद्र सरकारची संस्था पुणे तसेच त्यांच्या इतर शाखांमधून १० वी उत्तीर्णसाठी 'डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी' करता १२ आठवड्यांचे अर्धवेळ प्रशिक्षण देते. तसेच हा डिप्लोमा पूर्ण करणाऱ्या १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरता 'अॅडव्हान्स डिप्लोमा इन आय.टी.' हा २४ आठवड्यांचा अर्धवेळ अभ्यासक्रम आहे.

माहिती तंत्रज्ञानाचे आगामी शतकातील महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासन या तंत्रज्ञानाचे रूपांतर व्यवसायाभिमुख शिक्षणात करण्याच्या प्रयत्नात आहे. या योजनेअंतर्गत येत्या शैक्षणिक वर्षापासून ८ वी ते १०वी च्या अभ्यासक्रमात 'माहिती तंत्रज्ञान' हा वैकल्पिक (ऑप्शन) विषय समाविष्ट करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. हा विषय शिकविण्यासाठी माध्यमिक शाळांमध्ये कॉम्प्युटर प्रशिक्षण प्रयोगशाळा उभारण्यात येतील. तसेच महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत माहिती तंत्रज्ञानाचा ६ महिन्यांपासून ते १॥ वर्ष कालावधीचे वेगवेगळे अभ्यासक्रम समाविष्ट करुन प्रमाणपत्र, पदविका व पदवी देण्यात येईल.

**माहिती तंत्रज्ञान शाखेतील सेवाउद्योग :**

**१. कॉम्प्युटर हार्डवेअर :** या शाखेतील शिक्षित व्यक्ती स्वत:चे कॉम्प्युटर व तत्संबंधी उपकरणं जुळणी, सर्व्हिसींग व रिपेरींग वर्कशॉप सुरु करु शकते. मदर बोर्ड, फ्लॉपी ड्राइव्हज, हार्डडिस्क, लेझर प्रिंटर्स, स्कॅनर्स इ. भागांचा यात समावेश असतो. यासाठी पुष्कळ शैक्षणिक संस्थांमधून 'डिप्लोमा ईन कॉम्प्युटर इंजिनियरींग' हा पदविका अभ्यासक्रम असतो. १०वी (५० टक्के) ही किमान शैक्षणिक पात्रता या प्रशिक्षणासाठी लागते. या शाखेत मार्केटिंग व सेल्स ही व्यवसायक्षेत्रे सुद्धा लक्षात घ्यावी.

**२. ऑफिस ऑटोमेशन मशिन दुरुस्ती :** परदेशी बनावटीची माहिती तंत्रज्ञानासंबंधी यंत्रसामुग्री म्हणजे झेरॉक्स, फॅक्स, डेस्क-टॉप-पब्लिशिंग इ. ऑफिस ऑटोमेशन प्रॉडक्टस् देशभरात सहजगत्या उपलब्ध होऊ लागली आहेत. मात्र त्यांची दुरुस्ती व देखभालीसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक ज्ञानाची चणचण तंत्रक्षेत्रातील व्यावसायिकांना भासू लागली. बऱ्याच ठिकाणी यंत्रे बंद पडून त्याला भंगाराचे स्वरुप प्राप्त होत आहे. या क्षेत्रात प्रचंड प्रमाणात निर्माण होणाऱ्या रोजगारांची शक्यता लक्षात घेऊन वांद्रे, मुंबई येथील शासकीय तंत्र निकेतन तसेच इतर खाजगी संस्थांनी स्वयंरोजगारयुक्त तांत्रिक प्रशिक्षण वर्ग सुरु

केले आहेत. स्वतःचा उद्योग सुरु करणाऱ्या तरुण मंडळींनी या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

**३. कॉम्प्युटर सॉफ्टवेअर (आज्ञाप्रणावली) :** कॉम्प्युटरचा वापर करण्यासाठी विविध सॉफ्टवेअरचा उपयोग या शाखेत करतात. विशिष्ट कार्यासाठी सॉफ्टवेअर तयार करुन 'सॉफ्टवेअर पॅकेजेस' विकसित करण्यासाठीच्या स्वयंरोजगाराच्या संधी या क्षेत्रात उपलब्ध आहेत. भरपूर मागणी असलेल्या या शाखेत सॉफ्टवेअर तंत्रज्ञ वैद्यकीय व्यवसायाकरता 'मेडिकल सॉफ्टवेअर पॅकेज', लेखाशास्त्राकरता 'अकौंटिंग पॅकेज' आदी विशिष्ट सॉफ्टवेअर विकसित करुन स्वतंत्र व्यवसाय करु शकतात.

**४. कॉम्प्युटर ऑपरेशन्स :** या शाखेतील व्यक्ती कॉम्प्युटर ऑपरेटर, डाटाबेस अॅडमिनिस्ट्रेटर, प्रोग्रामर, डेटा प्रोसेसींग, डेटा एंट्री ऑपरेटर इ. सेवाउद्योग सुरु करु शकतात.

कॉम्प्युटर सॉफ्टवेअर आणि कॉम्प्युटर ऑपरेशन्ससंबंधी अभ्यासक्रम १२वी विज्ञान अथवा वाणिज्य उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१ यांच्या अंतर्गत प्रशिक्षण संस्था, पुणे, औंध तसेच अन्य काही संस्थांमध्ये उपलब्ध आहेत.

**५. इंटरनेटवरील सेवाउद्योग :** शालेय विद्यार्थी, गृहिणी, उद्योजक, व्यावसायिक अशा समाजातील सर्व व्यक्तींना कॉम्प्युटरचे वाहन 'मूषक' (माऊस!) वापरून विश्वातील माहितीचे भांडार खुले करणारा 'इंटरनेट' हा २०व्या शतकातील तंत्रज्ञानाचा चमत्कार व २१व्या शतकातील अनिभिषिक्त सम्राट आहे. इंटरनेट म्हणजे काही एक कॉम्प्युटर नव्हे, तर ते एक नेटवर्कसचे नेटवर्क (महाजाल) आहे. आज घराघरातून 'माहितीचे मायाजाल' पसरविणाऱ्या इंटरनेटशी अनेक देशांतील अनेक मोठी नेटवर्कस जोडली गेली आहेत व त्यामुळे कुठल्याही कॉम्प्युटरवरची माहिती दुसरीकडे कोठेही पाठविता येते. शिवाय यामुळे एकमेकांना ई-मेलच्या सहाय्याने पत्र पाठवता येतात. इंटरनेटला जोडण्यासाठी एक पर्सनल कॉम्प्युटर, 'मोडेम' नावाचे उपकरण व टेलिफोनची जरुरी असते. इंटरनेटमुळे ज्या स्वतंत्र व्यावसायांची क्षेत्र उपलब्ध झाली आहेत त्यांची माहिती खाली दिली आहे. इंटरनेटचे व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या पुष्कळ शैक्षणिक व खाजगी संस्था आहेत. इंटरनेट व्यावसायिक छोट्याश्या जागेत माहिती सेवा ('सायबरशॉपी') सुरु करु शकतात. शैक्षणिक, व्यापार / उद्योग, नोकरी, वैद्यकीय, जाहिराती, करमणूक, कला, पर्यटन, खेळ अशा कुठल्याही विषयावरील माहिती तात्काळ मिळण्याची इंटरनेटवर सोय आहे. अगदी सिनेमाची तिकिटं मिळविण्यापासून ते विवाहयोग्य जोडीदार निवडणं हे सुद्धा इंटरनेटवर होऊ शकते. या करता खालील सेवाव्यवसाय आहेत.

**(अ) ई-मेल (ईलेक्ट्रॉनिक मेल) :** आपल्या पोस्टाच्या पत्यासारखा ई-मेलमध्ये प्रत्येकाला ई-मेल आय.डी.असतो. ई-मेल केव्हाही कुठूनही येऊ शकतो, पोस्टापेक्षा कमी खर्च असल्याने ई-मेलला पुष्कळ ग्राहक असतात.

**(ब) वेब डिझाईनर :** वर्ल्ड वेब (www) किंवा वेब हे जागतिक माहितीच एक मोठ भांडारच आहे. यामध्ये वेगवेगळ्या विषयांवरच्या असंख्य वेबसाईटस् आहेत. इंटरनेट वरुन आपल्याला जी वेगवेगळ्या विषयांवरची माहिती मिळते ती जगभरच्या हजारो वेबसाईटवरून मिळते. एखाद्या कंपनीची माहिती, जाहिरात, वैद्यकीय माहिती अशा कामाकरता वेबपेज (होमपेज) डिझाईन करावे लागते. स्वतंत्र व्यवसायाच्या दृष्टीने हे एक वेगळे क्षेत्र आहे.

**(क) मल्टिमीडिया आणि अॅनिमेशन :** आपण ज्याप्रमाणे बोलतो, ऐकतो, लिहितो, हावभाव करतो आणि गातो याच कृती अक्षरं, आकडे, चित्र, चलतचित्र आणि आवाज या माध्यमाद्वारे इंटरनेटवरून प्रसारित होतात.

---

जन्म घेण्यात दुःख आहे, जगण्यात वेदना आहेत, आणि मरण्यात कष्ट आहेत.

साधारणपणे ६ महिने ते वर्षभराच्या प्रशिक्षणासाठी १२वी उत्तीर्ण ही शैक्षणिक पात्रता लागते. उद्योग, व्यापार, जाहिराती आदी क्षेत्रात या व्यवसायाला पुष्कळ मागणी आहे.

**(ड) ग्राफिक्स:** चित्रकलेसारख्या कलेची आवड असणाऱ्या व्यक्ती कॉम्प्युटर ग्राफिक्स डिझाईनिंगचे प्रशिक्षण घेऊन स्वत:चा व्यवसाय करु शकतात.

**(इ) ई-कॉमर्स (ई-बिझिनेस) :** इलेक्ट्रॉनिक्स कॉमर्स हा दोन प्रकारे होऊ शकतो. एक म्हणजे, आपण घरी बसून इंटरनेटवरून वस्तु खरेदी करणे जे 'बिझिनेस-टू-कन्झ्युमर' (बी.टी.सी.) या सदरात मोडत. दुसरं म्हणजे, दोन कंपन्यांमधील इंटरनेटद्वारे खरेदी-विक्रीसारखे पूर्ण व्यवहार (बी.टी.बी.) हे होय. आजच्या घटकेला 'बी.टी.बी.' या सदराखाली ४३०० कोटी डॉलर्सच (१डॉलर = ४४ रुपये !) तर 'बी.टू.सी.' त ८६० कोटी डॉलर्सचे व्यवहार होत आहेत. उज्ज्वल भवितव्य व आर्थिक फायदा असणाऱ्या या सेवाव्यवसायाचे प्रशिक्षण सरदार पटेल विद्यापीठ, गुजरात तसेच काही नामवंत संस्थामध्ये मिळते. कुठल्याही पदवीधर तसेच कॉम्प्युटर, विज्ञान, गणित,स्टॅटिस्टीक्स यातील द्वीपदवीधर किंवा सॉफ्टवेअर तंत्रज्ञ या शाखेत प्रशिक्षण घेऊन स्वतंत्र व्यावसायिक होऊ शकतो.

**६. कॉम्प्युटर सिम्युलेशन आणि मॉडेलिंग :** औद्योगिक किंवा रसायनिक कारखान्यात होणाऱ्या प्रक्रियेची प्रतिकृती ही प्रक्रिया सुरवात होण्यापूर्वी कॉम्प्युटरवर विकसित करता येते. उद्योग क्षेत्रात या व्यवसायाला पुष्कळ मागणी आहे.

**७. रोबोटिक्स अँड ऑटोमेशन व अर्टिफिशयल इंटलिजन्स :** या तंत्रज्ञानामुळे औद्योगिक प्रक्रिया पूर्णत: स्वयंचलित करणे तसेच संशोधन क्षेत्रात क्रांती करणे शक्य झाले आहे. व्ही.जे.टी.आय., मुंबई येथे अभियांत्रिकी शाखेतील पदवीधारक या १ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. कॉम्प्युटर रोबो (यांत्रिक मानव) हा पाश्चात्य देशांमध्ये वापरात येऊ लागला असला तरी भारतात तो विकसनशील असल्याने या व्यवसायाला हळूहळू मागणी येत आहे.

**८. मेडीकल ट्रान्सक्रिप्शन :** नवीन सुरू झालेला हा वैद्यकीय नेटवर्क सेवाव्यवसाय आहे. अमेरिका, इंग्लंड आदी पुढारलेल्या देशातील डॉक्टर्स वेगवेगळ्या रोगांविषयी माहिती व त्यावरील उपचार डिक्टाफोनवर मुद्रित करतात. या ध्वनीलहरी डिजिटल (म्हणजे इलेक्ट्रॉनिक) स्वरुपात बदलून ती माहिती इंटरनेटवरून इच्छुकांना द्यायची अशा स्वरूपाचा हा सेवा व्यवसाय आहे. काही निवडक संस्थामध्ये याचे ६ महिन्याचे प्रशिक्षण दिले जाते. किमान १२वी उत्तीर्ण व जुजबी वैद्यकीय परिभाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

माहिती तंत्रज्ञानासंबंधी असलेले अभ्यासक्रम तसेच त्यातील वेगवेगळे सेवाउद्योग याविषयी अधिक माहिती कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया, १५, हाजी अली पार्क, मुंबई येथे मिळू शकेल.

राष्ट्रीय योजना आयोगाच्या पहाणीनुसार इ.स. २०१० सालात एकूण बेकारांपैकी ६० टक्के बेरोजगार शिक्षित असतील. नोकऱ्यांचे कमी होत जाणारे प्रमाण लक्षात घेऊन माहिती तंत्रज्ञानासारख्या उज्वल भवितव्य असलेल्या क्षेत्राचा स्वत:च्या व्यवसायाच्या दृष्टीने युवकांनी व त्यांच्या पालकांनी विचार करणे अत्यावश्यक आहे. आगामी २१व्या शतकात इंग्लिश भाषेची जोड व त्या बरोबर व्यवहारिक ज्ञान व कौशल्य याचे योग्य मार्केटिंग केल्यास या क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या भरपूर संधी मिळतील.

**प्रवीण विनायक प्रधान**
७३/१०२, सोनचंपा, वसंत विहार, पोखरण नं. २,
ठाणे (प.)४०० ६०१. दूरध्वनी : ५४२ ५९२६
*(स्पर्धा डिसेंबर ९९ वरून साभार)*

•••

जीवन म्हणजे सुखदु:खाचे मिश्रण.

# शिक्षणात ज्ञानापेक्षा माध्यमाचेच वर्चस्व अधिक

**श्री. प्रदीप कर्णिक**

*(शिक्षण प्रक्रियेत ज्ञानार्जनाऐवजी माध्यमविचारांचाच बाऊ केला जातो. आजही मराठी घरांमध्ये आपले मूल इंग्रजी माध्यमात घालावे असाच विचार होतो. या माध्यम वर्चस्वाच्या इतिहासाचा मागोवा या लेखात घेतला आहे. - संपादक)*

महाराष्ट्रात मुळात विज्ञानाची आणि व्यापाराची परंपरा नाही. विज्ञानाविषयी उत्सुकता, जिज्ञासा निर्माण व्हावी लागते. तशी अनुकूल परिस्थिती कधीच राज्यकर्त्यांनी निर्माण केली नाही. विज्ञान आणि व्यापार यांच्याकडे जसे त्यांचे लक्ष नव्हते तसेच विविध कलांच्याकडे त्यांचे लक्ष नव्हते. शिवकाळातच उत्तरेस ताजमहल आणि दक्षिणेस गोलघुमट तयार झाला होता पण त्याविषयी उल्लेख, त्या संबंधी कौतुक, उत्सुकता,जिज्ञासा कुठल्याही कागदपत्रात आढळत नाही. थोरल्या माधवरावांच्या पदरी एक युरोपियन डॉक्टर होता, दुसऱ्या बाजीरावाला देवी टोचून घेतल्या होत्या. पण हे ज्ञान काय आहे, याचा अभ्यास कसा करायचा, याचा कसा व किती फायदा होतो याविषयी राज्यकर्त्यांमध्ये आणि जनमानसात जराही औत्सुक्य दिसून आले नाही. किल्ले, वाडे, देवळे, घाट, धर्मशाळा, अन्नछत्रे इत्यादींसारखे काही प्रमाणात उपयुक्त आणि धार्मिक स्वरुपाचे बांधकाम करण्यात आले होते पण त्यातही कलात्मक दृष्टी होती का? वि.का. राजवाडे 'राधामाधवविलासचंपू' च्या प्रस्तावनेत त्याविषयी लिहिताना असे लिहितात, 'दोन-अडीचशे वर्षांच्या मराठ्यांच्या आमदानीत एकही देऊळ, किंवा एकही मूर्ती, एकही चित्र असे दाखविता येत नाही, की जे चालुक्यादींच्या देवालयांशी किंवा मूर्तींशी किंवा चित्रांशी दूरचीही बरोबरी करील.'

दुसरा बाजीराव सत्तेवर आला तोच मुळी इंग्रजांच्या मदतीने. त्याचे त्याच्याच माणसांशी अनेक प्रकारे वैर होते. दुसऱ्यांच्या मदतीने सत्ता टिकविणे हेच मुळात ज्या राज्यसत्तेचे हेतू असतात. त्यांच्या काळात सुधारणेला फारसा वावच नसतो. शैक्षणिक हक्क हा परंपरेने अर्थातच ब्राह्मणांच्याकडे असल्याने पेशवाईत त्यात काही एक बदल झाला नाही. व्यावहारिक शिक्षणासाठी पंतोजींच्या आणि वैदिक शिक्षणासाठी शास्त्री, पंडित यांच्या शाळा देणग्या, गुरुदक्षिणा, श्रीमंतांच्या, सरदारांच्या, वतनदारांच्या आश्रयावर चालत होत्या. कुठल्याही प्रकारचा ऐहिक भाग त्या शिक्षणाला वर्ज्य होता. न.चि. केळकर याविषयी लिहितात, 'धर्मग्रंथाबाहेर स्वतंत्र वाङ्मय असा पदार्थच असू शकत नाही, अशी मराठेशाहीत कल्पना होती. मोरोपंतांची कविता आज आपण वाङ्मय या सदरात घालतो. पण पेशवाईच्या काळाच्या ग्रंथसूचीत ती कदाचित धर्मग्रंथांत पडली असती. मोरोपंतांच्या ग्रंथांत मुख्यतः भारत, भागवत, रामायण, हेच विषय असल्यामुळे व त्यांची स्फुट कविताही केवळ भक्तिप्रधान असल्यामुळे ते ग्रंथ धर्मग्रंथांच्या सदरात घालणेच प्रशस्त वाटले असते. मोरोपंतांच्या ग्रंथांच्या पोथ्या लिहून घेतल्या जात, पण अब्राह्मणांच्या हाती मोरोपंतांची कविताही ब्राह्मणाने सहसा पडू दिली नसती असे वाटते. वेद, वेदांगे, पुराणे हे तर धर्मवाङ्मयच होय. वाटेल ती विद्या धर्मपर मानण्याची - धर्माच्या सदराखाली कोंबण्याची प्रवृत्ती फार जारी होती, असे दिसते. धर्मविचाराची ही एककल्ली दिशा सोडून दिली, तरी व्यावहारिक शिक्षण फारसे नव्हते, असेच आढळून येते. अक्षर, साधे गणित, हिशेब थोडेसे संस्कृतज्ञान यांतच

सापासारख्या भासणाऱ्या दोरीचे खरे स्वरूप ज्याला कळते त्यालाच आयुष्याचा खरा बोध होतो.

उच्च प्रतीच्या गृहस्थांच्या शिक्षणाची परिसमाप्ती तेव्हा होत असे.'

इंग्रज पूर्व काळात शिक्षणाची साधने अत्यंत अल्पप्रमाणात हाती होती आणि अत्यंत मूठभर लोकांच्या हातात शिक्षणाची सूत्रे होती. बहुजनसमाजाचा त्याच्याशी संबंधही नव्हता. इंग्रजांच्या राजवटीत हे चित्र बदलले. लोकमान्य टिळकांनी इंग्रज राजवटीचे फायदे सांगताना केसरीत असे लिहिले आहे की, ' शांतता, कायद्याची सर्वत्र व्यवस्था, अपराध्यांचा बंदोबस्त, सार्वजनिक आरोग्य, व्यापार समृद्धी, शेतकीसुधारणा, खनिज व उद्भिज्ज संपत्तीची अभिवृद्धी, विद्यादानाच्या अनुपम सोयी, स्वराज्य - कारभाऱ्यांची प्राप्ती, लेखन स्वातंत्र्य, यंत्रादी सामग्रीचा परिचय आणि स्वातंत्र्याची अभिरुची.'

बाजीरावाच्या काळात समाजात कमालीचा आळशीपणा, व्यसनीपणा, छंदी फंदीपणा बोकाळला होता. अंधश्रद्धा, जातीयता, मूर्खसमजुती, वाईट चालीरिती, प्रचंड धर्मांधता, जागोजाग ठिय्या देऊन बसली होती. या सर्व अज्ञानजन्य समजुती दूर व्हायच्या असतील तर एल्फिन्स्टनच्या मते शिक्षण हाच एकमेव उपाय होता. इ.स. १८१५ मध्ये स्थापन झालेली 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' ही संस्था खाजगी होती. याच संस्थेचा आधार घेऊन एल्फिन्स्टनने देशी भाषातून ग्रंथनिर्मिती केली व त्यासाठी त्याला १८२० मध्ये 'द नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक कमिटी' स्थापन करावीशी वाटली. हिलाच पुढे इ.स. १८२२ मध्ये 'द बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन अँड स्कूल बुक सोसायटी' हे नाव मिळाले. हिलाच १८२७ मध्ये 'द नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' हे नाव प्राप्त झाले. इ.स. १८३७ मध्ये याच संस्थेचे 'दी एल्फिन्स्टन नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' असे नाव ठेवण्यात आले. पुढे १८४० मध्ये 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' मध्ये रूपांतर झाले. १८२० ते १८४० पर्यंत मराठी वाङ्मयात ज्या घडामोडी झाल्या त्या या संस्थे मार्फतच झाल्या.

ग्रंथांचे लेखन, प्रकाशन, प्रोत्साहन, पुरस्कार इत्यादी उद्दिष्टांनी शिक्षणाचे कार्य सुरु झाले. त्यात अनेक अडचणी येत होत्या. लोकांच्यात शिक्षणाची हौस नव्हती, छापखान्यात देशी भाषेत छापण्यासाठी खिळे इंग्लंड वरुन आणावे लागत होते, शैक्षणिक गरजा भागविण्यास योग्य असे ग्रंथ नव्हते, ग्रंथकार नव्हते. पण तरीही कंपनी सरकारने या कामासाठी १८२५-१८३२ पर्यंत दोन लाखांहून जास्त रक्कम खर्च केली होती.

बापू छत्रे, हरि केशवजी, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, म.गो. कुंटे वगैरे मंडळींनी सरकारच्या धोरणानुसार अनेक नवीन ज्ञानाचा, शास्त्र, कलाचा, वाङ्मयाचा देशी भाषेत लोकांना कळेल असा अनुवाद केला. काही वेळा पुस्तके फुकट वाटली. देशी भाषेत ज्ञान आणून ज्ञानाचा मार्ग सर्वसामान्यांना खुला करण्याचा प्रयत्न केला.

## शिक्षणविषयक धोरणात बदल

१८१३ साली सुरु झालेल्या शिक्षणविषयक धोरणात १८३३ पासून मात्र निराळेच वळण लागले, निराळीच दिशा मिळाली, आणि त्याचे परिणाम दीर्घ काळ टिकले व आजही ते आपल्याला त्रास देत आहेत. देशी भाषा, देशी भाषेतील चांगले ग्रंथ यांना उत्तेजन देण्याचे त्यांना शैक्षणिक माध्यम बनविण्याचे धोरण जाऊन त्या जागी इंग्रजी शिक्षण व इंग्रजी माध्यम यांचेवरील भर वाढीस लागला.

१८३३ साली कंपनीला नवी सनद देताना इंग्रजी शिक्षणाचा आदेश त्यांना मिळाला होता. तसेच आतापर्यंत देशीभाषेतून शिक्षण देण्याचा उपक्रम अत्यंत असाधानकारक वाटत होता. लॉर्ड मेकॉले हा इंग्रजी माध्यमाचा पुरस्कर्ता कंपनी सरकारच्या नोकरीत महत्वाच्या हुद्यावर होता.

---

आयुष्य ही एक अखंड प्रक्रिया असून विदारक सत्य आहे.

याचा संपूर्ण एक परिणाम म्हणून त्या वेळचा गव्हर्नर जनरल बेंटिंक याने इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करणारे फर्मान दि. ७ मार्च १८३५ रोजी काढले. आणि सारी शिक्षणाची दिशा बदलली. ज्या भाषेत चांगले ग्रंथ नव्हते, नवीन ज्ञान येत नव्हते म्हणून काही उद्दिष्टे समोर ठेवून चालू केलेली शिक्षणविषयक घडी मोडून गेली. दुसऱ्याच वाटेला लागली.

यामुळे शिक्षण पुन्हा मूठभर मध्यमवर्गीयांपुरतेच मर्यादित झाले. याला पूर्णपणे माध्यमविषय धोरण कारणीभूत होते. कोणतीही परकीय भाषा कितीही श्रेष्ठ झाली, तरी सामान्य माणसाच्या शैक्षणिक विकासाचा विचार केला तर ती भाषा मातृभाषेचे स्थान कधीही घेऊ शकणार नाही. अशा विचित्र निर्णयामुळे बहुजन समाज मागासलेला तर राहिलाच पण देशी भाषा मागसालेल्याच राहिल्या. स्वतंत्र विकास होण्याची जी समता निर्माण झाली होती ती लोप पावली. पूर्वी ती संस्कृतच्या ओंजळीने पाणी पिई; आता ती इंग्रजीच्या ओंजळीने पाणी पिऊ लागली. स्वभाषेकडे उपेक्षेने पाहणारा एक वर्ग निर्माण झाला. इंग्रजपूर्व चातुर्वर्ण्य व्यवस्था होती. ती गेली आणि तिच्या जागी 'आंग्लभाषाकोविदां' चे नवे चातुर्वर्ण्य निर्माण झाले. विद्वान माणसाचे आचार, विचार, लेखन, वाचन, भाषण, संस्कार, व्यवहार सर्व इंग्रजीतून होऊ लागले. मराठीकडे त्यांनी कधीच आपुलकीने बघितले नाही. मग मराठीच्याकडे सामान्य दर्जाचे, सामान्य अभिरुचीचे, असंस्कृत असे लोक गोळा होऊ लागले. यामुळे इंग्रजी भाषेतील विचारसंपदेचा आणि चिंतनाचा लाभ देशी भाषांना तेवढासा मिळू शकला नाही. अनेक देशी भाषेच्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना इंग्रजी भाषेत आहेत. वृत्तपत्रे बऱ्याच काळापर्यंत द्वैभाषिक राहिली. 'आपण मराठी भाषेचे शिवाजी असल्याचे' तेजस्वी उद्‌गार विष्णुशास्त्रींनी इंग्रजीत लिहून ठेवले.

भाऊ महाजन यांनी आपल्या 'प्रभाकर' या वृत्तपत्रात त्यावेळच्या भाषेचे जे स्वरूप होते त्याचे यथार्थ चित्रण करून ठेवले आहे. ते लिहितात, ' येथील लोकांची भाषा व स्थितीरीति ही विलक्षण होत चालली आहेत. ती अशी की, ते बोलू लागले असता पंचवीस शब्दांमध्ये वीस शब्द इंग्रजी येऊन मध्ये विभक्ती, अव्यये, सर्वनामे आणि प्रसिद्ध क्रियापदे इतकी मात्र बहुधा स्वभाषेची उपयोगात आणतात. तसेच नमस्कार करणे अथवा आगतस्वागत विचारणे झाल्यास इंग्रजी शब्दांनी करतात.'

आज १५० वर्षांच्या वर कालावधी उलटून गेला आहे. बेंटिक याने १८३५ साली काढलेले फर्मान त्यांच्या राजवटीच्या स्थिरतेच्या दृष्टीने काढलेले होते, पण आज स्वतंत्र भारतात का म्हणून असे धोरण ठेवायचे ? दोन तीन टक्के लोकांना समजणाऱ्या भाषेत देशाचा कारभार चालावा आणि ९७, ९८ टक्के लोकांवर विनदिक्कत अन्याय करावा याच्या सारखा दुसरा संतापजनक प्रकार नसेल. आज नवे नवे लागणारे शोध, येणारे नवे नवे ज्ञान बहुजनसमाजापर्यंत कसे जाईल याचा सर्व साधारण विचारही या मूठभर लोकांच्या डोक्यात येऊ नये यासारखा विसंगतपणा दुसरा नसेल. भाषा वार प्रांतरचना झाली, डॉ. राम मनोहर लोहिया यांचा प्रचंड लढा झाला, साहित्य संस्कृती मंडळ, साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, सरकारी परिभाषा शब्दकोश मंडळे इत्यादी अनेक गोष्टी या देशात होऊन गेल्या, काहींचे कार्य जसेच्या तसेच आहे काही जण थोडा बहुत प्रयत्न करून राहिलेत.

मातृभाषेत शिक्षण देणे, मातृभाषा समृद्ध करणे या गोष्टी साठी काय फक्त शासनाकडेच डोळे लावायचे आहेत का ? ती सर्वांचीच जबाबदारी नाही ? साहित्यिक, संशोधक, विद्वान, प्राध्यापक, शिक्षक, वृत्तपत्रे मासिके , लेखक इत्यादी सर्वांचेच ते काम आहे. आपल्या भाषेत नुसते परिभाषा शब्दकोश तयार करून 'काम झाले' असे म्हणण्यात काय अर्थ आहे ? ते शब्द नित्य, रोज लेखनात, बोलण्यात, व्यवहारात वापरायला हवेत , तरच ते नेहमीच्या

---

जे काम करावे लागते तेच काम आवडीने करून घेणे हाच जीवनात शिकण्याचा सर्वात मोठा व महत्वाचा धडा आहे.

सरावाचे होणार आहेत. जर शब्द कठीण असतील तर त्याचा सातत्याने शोध करत राहिले पाहिजे. पर्यायी शब्द निर्माण केले पाहिजेत. संस्कृतचा आधार म्हणून तो योग्य शब्द व इतर भाषेचा आधार म्हणून तो टाकाऊ शब्द ही आग्रही भूमिका सोडायला हवी. विशेषत: विज्ञान शाखेत पारंगत असणाऱ्या तज्ज्ञ माणसांची ही जबाबदारीच आहे की त्यांना समजलेले ज्ञान त्यांनी आपल्या मातृभाषेमध्ये देणे गरजेचे आहे. बहुजनसमाजाला तो विषय समजेल, उमजेल अशा स्वरुपात त्यांचे भाषांतर, रूपांतर वा ओळख, परिचय असायला हवा.

आज भाषांतरांचे, रुपांतरांचे काम होते आहे. पण त्याची भाषा अशी वापरली जाते की भल्या भल्यांना ती वाचत असता ठायीठायी अडचण भासते. म्हणजे इंग्रजी भाषा परकी म्हणून तिचे स्वरुप कळत नाही, आणि मराठी ही संस्कृतप्रचुर म्हणून समजत नाही असे काहीसे स्वरुप आले आहे. ज्ञानाला महत्त्व देण्याऐवजी भाषेला, माध्यमाला महत्त्व देणारे लोक सामान्य बहुजनांवर किती अन्याय करत आहेत. आज १५० वर्षानंतरही ही स्थिती रहावी आणि त्याचे आपल्याला अजून गांभीर्य लक्षात येऊ नये या सारखी वाईट अवस्था ज्ञानाच्या क्षेत्रात दुसरी नाही.

**प्रदीप कर्णिक**
सोनल अपार्टमेंट, वंदना सोसायटी समोर,
ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी: ५४०४२०६

• • •

(मुखपृष्ठ १ वरून)

**संपादकीय**

**बेचैन मन !**

एकीकडे 'पुल'ना अश्रुपूर्ण निरोप देत असतानाच विद्या प्रसारक मंडळाच्या कीर्तीत भर पडावी अशा दोन उत्साहवर्धक घटना घडल्या. शालांत परीक्षेच्या निकालात मुंबई विभागात सौ. अ.के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेचा कु. नचिकेत थोरात हा पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला आणि त्याने शाळेचे व संस्थेचे नांव उज्ज्वल केले. इंग्रजी माध्यम शाळेचा मुलगा बोर्डात प्रथम येण्याचा हा पहिलाच प्रसंग ! कु. नचिकेतचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर व सर्व शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन ! इंग्रजी माध्यम शाळेचा सलग सहाव्या वर्षी १०० टक्के निकाल लागला आहे. नावलौकिकात फार मोठी घटना असून शाळेच्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालींसाठी शुभेच्छा !

दुसरी घटना म्हणजे बा.ना. बांदोडकर महाविद्यालयाची कु. प्राजक्ता सीताराम सारंग ही विद्यार्थिनी बी.एस्.सी. परीक्षेत ८९.८८% गुण मिळवून मुंबई विद्यापीठात १ली आली. रसायन शास्त्र हा तिचा विषय होता. महाविद्यालयाच्या यशात तिने मानाचा तुराच खोवला. संस्थेच्या आजवरच्या इतिहासात या दोन्ही गोष्टी सुवर्णाक्षराने लिहिण्यासारख्याच आहेत.

नवीन अंक आपल्या हाती देत असतानाच या घटनांमुळे मनात थोडी चलबिचल आहे, पण काळ कोणासाठी थांबत नाही. व जो थांबला तो संपला ! तेव्हा आपले मार्गक्रमण असेच चालू राहील.

Miles to go before I sleep !

अचलकुमार टिह्ळू
संपादक

• • •

# मी पाहिलेली इटाली ! (उत्तरार्ध)

डॉ. ग.त्रिं. दाभाडे

*( इटालीच्या प्रवास वर्णनाचा उतरार्ध येथे देत आहोत. लेखकाची निरीक्षण शैली हे या लेखाचे खास वैशिष्ट्यच !- संपादक)*

ॲड्रीॲटीकची राणी म्हणून ज्या जलनगरीचा गौरव केला जातो त्या जलनगरी व्हेनिसचा निरोप ८ सप्टेंबर, १९९८ ला सकाळी ९.०० वाजता घेऊन आमच्या व्हेरा टूर या कंपनीची बस व्हेनिसहून जी निघाली ती सतत सहा तासांच्या प्रवासात ३५० कि. मी. अंतर कापल्यानंतर पिसा या टुमदार नगरीला पोहोचली. पिसा हे शहर रोम पासून दीड तासांच्या अंतराबर आहे. हे शहर लिगुरीयन समुद्राजवळ असलेल्या अर्नो नदीच्या काठावर आहे. जगातील सुंदर चौकांपैकी असलेला 'मिरा कोली चौक' हा शहरात प्रवेश करताच लागतो. महान खगोल शास्त्रज्ञ गॅलिलीओ ह्याची कर्मभूमी जरी पादुआ विद्यापीठ होती, त्याचप्रमाणे तो या पिसा शहराचा नगरवासीपण होता. जगातील आर्श्चर्यांपैकी एक म्हणून ज्याची गणना केली जाते तो पिसाचा कलता मनोरा पाहण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यांतून लोक येत असतात. असे सांगण्यात आले की, या मनोऱ्याचे बांधकाम सुरवातीस अडचणीत सापडले होते. तीन मजले बांधले गेले. नंतरच्या काळांत बांधकाम पूर्ण केले गेले. हा पिसाचा मनोरा फार पूर्वी पासून पृथ्वीच्या प्रेमात पडला असल्यामुळे दरवर्षी १ सें.मी. या प्रमाणात झुकत राहून त्याचे भूप्रेम कणाकणाने दरवर्षी वाढतच आहे. लवकर एक दिवस असा येईल की त्या दिवशी तो भूमातेच्या गुरूत्वाकर्षण शक्तीला शरण जाईल नि तो पिसाचा शरण दिन जागतिक चर्चेचा दिवस ठरेल.

पिसाचा झुकता मनोरा बघितल्यावर १ तासानी म्हणजे संध्याकाळी ७ वाजता रोमच्या विमानतळावर पोहोचलो. रोमला पोहोचल्यावर प्रश्न पडला तो पुढील चार दिवस कोठे रहायचे. कारण या आयोजित केलेल्या अभ्यासदौऱ्यात रोमचा समावेश नव्हता. रोममध्ये ४ दिवस राहण्याचा खर्च स्वतःकरावा लागणार होता व ह्या अडचणीत भर म्हणजे अस्मादिकाजवळ असलेले २०० डॉलरचे तुटपुंजे परकीय चलन. म्हणून ठरविले की आधी रोमला रेल्वे स्टेशनवर जायचे. तेव्हा सर्वप्रथम विमानतळावरून रेल्वेने रोमच्या रोमा टर्मीनी या प्रमुख रेल्वे केंद्रावर अर्ध्या तासात पोहोचलो. रोम विमानतळावर असलेल्या पर्यटन केंद्रावर घेतलेल्या माहितीच्या व नकाशाच्या आधारे रोम रेल्वे स्टेशनजवळ हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था होईल की नाही म्हणून तेथे चौकशी केली, तर समजले की, तेथे हॉटेलमध्ये राहण्याचा खर्च दिवसाला ८५ डॉलर (म्हणजे ३५०० रूपये) ऐकूनच सर्दच झालो. अस्मादिकाजवळ होते २०० डॉलर म्हणून यातून मार्ग काढण्यासाठी ठरविले की, रोम रेल्वे स्टेशनपासून एक किलोमीटर असलेल्या २० सप्टेंबर रोडवरील भारतीय वकिलातीत जाऊन सल्ला घ्यायचा. भारतीय वकिलातीचे मुख्य दरवाजाजवळील बेलचे बटण दाबल्यावर एक शीख सुरक्षा रक्षक बाहेर आला. त्यास भारतांतून इटालीत येण्याचे प्रयोजन सांगून मला ४ दिवस रोममध्ये राहून १३ सप्टेंबर १९९८ ला भारतात परत जाण्याचे सांगितले. त्याचप्रमाणे माझी ४ दिवस वकिलातीत कोठेही राहण्याची ह्या संबंधी विनंती केली. तेव्हा त्या सुरक्षा रक्षकाने हिंदीतून सांगितले की, आता वकिलात बंद झाली आहे. उद्या सकाळी या. मी त्यास माझ्याजवळ मर्यादित प्रमाणात डॉलर असल्यामुळे

---

**मला देशासाठी बलिदान करण्यास एकच आयुष्य आहे, याची मला खंत वाटते.**

महागड्या हॉटेलमध्ये परवडत नाही, तेव्हा हवे तर आजची रात्र तुमच्या वकिलातीच्या स्वागतिकेमध्ये काढू द्या असे म्हटले. तेव्हा त्याने सांगितले इथे कोणासही राहण्याची परवानगी नाही. पण थांबा माझ्या साहेबांना फोन करतो नि तुम्ही त्यांच्यांशी बोला. त्याप्रमाणे त्याने फोन लावला. मवसंबंधी माहिती सांगितल्यावर मला म्हणाला की, मी इथले कौन्सीलर श्री. एस्.एम्. माथुर साहेब यांच्याशी फोनवर तुमच्या संबंधी बोललो, आता तुम्ही फोनवर त्यांच्याशी बोला. फोनवर श्री. माथुर यांना माझे इटलीत येण्याचे प्रयोजन तसेच परतीचा प्रवास व जवळ असलेले मर्यादित परकीय चलन इत्यादी संबंधी बोलून, सवलतीच्या दरात माझ्या राहण्याच्या व्यवस्थेसंबंधी विनंती केली असता श्री. माथूर जरा रागाने म्हणाले एवढे कमी परकीय चलन (२०० डॉलर) जर तुमच्याकडे आहेत तर तुम्ही इटलीत कशाला आला? भारतातून निघण्यापूर्वी काळजी घ्यायला हवी होती. तेव्हा त्यांना मी सांगितली की इथे पेईंग गेस्टची पद्धत असल्यामुळे ४ दिवस कोठेतरी रोममध्ये राहण्याची सोय होईल. मला भारतात बऱ्याच मित्रांनी सांगितले म्हणून मी भारतात परतताना ४ दिवस रोम बघण्यासाठी मुक्कामाकरिता राखून ठेवले. एवढे सांगितल्यावर मला म्हणाले ठीक आहे. मी माझ्या सुरक्षारक्षकाला एका बऱ्यापैकी पण सवलतीच्या दरात हॉटेलमध्ये व्यवस्था करायला सांगतो, म्हणून परत त्यांनी फोनवर सुरक्षारक्षकास सूचना दिल्या व मला सकाळी ९ वाजता त्यांच्या कार्यालयात भेटण्यास सांगितले. त्यानंतर सुरक्षा रक्षकाबरोबर भारतीय वकीलातीपासून १-२ फर्लांग अंतरावर असलेल्या HOTEL PENSIONE ELIDE मध्ये दिवसाला ३५ डॉलर प्रमाणे राहण्याची चार दिवसांसाठी सोय केली. ती ८ सप्टेंबर १९९८ ची रात्र हॉटेलात काढल्यावर सर्व प्रथम सकाळी ९ वाजता भारतीय वकिलातीतले कौन्सीलर श्री. माथुर साहेबांना भेटलो. भेटताच सौजन्यपूर्वक स्वागत करून हॉटेलमध्ये सोय कशी काय आहे? इ. चौकशी करून त्यांनी सर्वप्रथम कॉफी घेण्याचा आग्रह केला. नंतर त्यांनी सांगितले हे पहा प्रोफेसर साहेब तुमच्याकडे आहेत फक्त २०० डॉलर! लॉजिंगसाठी ते काटकसर करून वापरावे लागणार आहेत. तेव्हा एक काम करा असे सांगून एक चांगल्यापैकी असलेला रोम शहराचा नकाशा त्यांनी मनपुढे केला नि म्हणाले आपली ही वकिलात, रोमा टर्मीनी रेल्वे स्टेशन तसेच तेथे असलेली सिटी बस वाहतूक केंद्र हे सर्व रोम शहराच्या मध्यभागी आहे. येथून कोठेही प्रेक्षणीय किंवा इतर कोठेही गेलात तरी अंतर आहे फक्त दीड ते दोन किमी. येथून व्हॅटकिनचे सॅन पॅट्रो (सेंट पीटर्स) जसे २ किमी. अंतरावर तेवढ्या अंतरावर रोम विद्यापीठ आहे. तेव्हा तुम्ही रोज म्हणून कोठे गेलात तरी पायी जा. मदतीसाठी हा मार्गदर्शक नकाशा बरोबर असू द्या. प्रत्येक ठिकाणी बसने गेलात तरी तुम्हास परवडणार नाही. येथून Vatican चे किंवा रोम विद्यापीठाचे बसचे जाणेयेण्याचे भाडे आहे ३००० लिरा (म्हणजे ७५ रूपये). तो रोमचा अधोरेखांकित नकाशा जवळ घेऊन श्री. माथुर साहेबांना परत भेटण्याचे आश्वासन देऊन रोम पहाण्यासाठी मी त्यांचा निरोप घेतला नि वकिलातीच्या बाहेर पडलो.

रोम शहर पाहण्याचे ठरविले-रोम शहर टायबर नदीच्या दोन्ही तीरावर टीरीयन समुद्राच्या पूर्वेस २७ किमी. अंतरावर मध्य इटालीमध्ये वीस टेकड्यांवर व सपाट प्रदेशावर वसलेले आहे. ज्या तीन टेकड्यांवर प्राचीन ऐतिहासिक भग्न वस्तूंचे अवशेष मिळतात त्याम्हणजे अॅव्हन्टाईन, सीलअन, पॅलेटाईन ह्या होय. रोमची स्थापना इ.स. पूर्व ७५४ मध्ये २१ एप्रिल रोजी रोम्युलस व रेमुस या दोन बंधूनी केली. रोम (Rome)हा शब्द ज्या एट्रस्कॉन (Estruscon) लोकांनी रोमवर राज्य केले त्यांच्या भाषेतील रूमॉन (Ruman) या शब्दापासून झाला. रोमला शाश्वतनगर म्हणून संबोधले जाते. कारण या शहराच्या मागे एक महान असा प्रदीर्घ इतिहास आहे. तसेच अभिजात

आजच्या आयुष्यात (सत्कर्म करून) जो चांगले आयुष्य घालवतो, तेच त्याला इथून पुढेही याहून चांगले आयुष्य बहाल करते.

कलेचा समर्थ वारसा लाभलेला आहे. रोमन साम्राज्यापूर्वी इ.स.पू. १२००-१०००च्या काळात इट्रुस्कन लोकांनी टायबर नदीच्या पश्चिमेस बसाहत केली. त्यांची संस्कृती अत्यंत उच्च दर्जाची अशी वैभवशाली होती. नंतर इट्रुस्कन वसाहतीवर रानटी टोळ्यांनी सतत आक्रमण केल्याने ती संस्कृती नष्ट झाली. रोममध्ये इ.स. पूर्व ५१० मध्ये स्थापिलेले साम्राज्य म्हणून त्यास रोमन साम्राज्य म्हणतात. त्याचा शेवट इ.स.४७६ मधे रोमन राजा ऑगस्टसला त्याचा सेनापती ओडोव्हकेटने पदच्युत केल्याने लयास गेले. नि रोमन कॅथॉलिकचा म्हणजे पोपच्या सत्तेचा मध्ययुगाचा अंमल सुरू झाला. तो इ.स. ११०० च्या पर्यंत म्हणजे प्रबोधनाच्या काळापर्यंत टिकून होता. मध्ययुगात जी पोपची सत्ता सुमारे ६०० वर्षे सर्व इटालीवर होती. त्याचे आजचे प्रतीक म्हणजे व्हॅटिकन सिटी! व्हॅटीकन पहाण्यासाठी रोमा टर्मीनी रेल्वे स्टेशनजवळ मुख्य बसस्टॉप आहे. तेथून ६४ नंबरच्या सॅन पॅट्रो San Patro (म्हणजे व्हॅटिकन मध्ये असलेले सर्वात मोठे बॅसलिका सेंट पीटर्स चर्च) ला जाणाऱ्या बसमध्ये प्रवास केला. बसचे तिकीट काढण्यास वेळ जात नाही. तिकीट जसे मुख्य बस स्टॉपवर मिळते तसेच रेल्वे स्टेशन मधील दुकानात किंवा मेन रोडवर तबाची (Tabbachi) असे नाव असलेल्या सिगारेट इत्यादी वस्तूंच्या छोट्या दुकानातून प्रवासापूर्वी कितीही दिवस अगोदर काढता येते. बसमध्ये शिरल्यावर १५०० लिराचे (रु. ३७.५०) तिकीट व्हॅलीडेटींग मशीनमध्ये प्रवास योग्य करून घेतले नि बसमध्ये जागा पकडली. सर्वच बसेस वातानुकुलित असून बसण्याची जागा ऐसपैस होती. उभे राहण्यासाठी म्हणून चांगली मोकळी जागा असल्यामुळे प्रवास सुखदायक झाला. आपल्याकडे जशी धावाधाव, लाईन तोडून घुसणे, धक्काबुक्की, इत्यादी प्रकार येथील प्रवासात कुठे दिसत नाही. कारण येथे प्रत्येकास नागरी जीवनाची जाण आहे. येथील बसमध्ये सुरवात झाल्यावर दरवाजा आपोआप बंद होतो नि स्टॉप आल्यावर आपोआप उघडला जातो. येथे बसमध्ये कंडक्टर नसतो कारण नागरिकात शिस्त व देशाभिमान असल्याने जो तो प्रवासापूर्वीच तिकिटे विकत घेऊन ती बसमधील व्हॅलेडेटींगच्या मशीनमधून प्रवास योग्य करून घेत असल्याने कंडक्टरची गरज राहत नाही. स्टॉप आल्यावर जो तो उतरतो नि बसमध्ये चढतो नि थोड्याच वेळात बस चालू होते. बसने प्रवास केल्यावर १० मिनिटात व्हॅटिकन आले नि तेथील सॅन पॅट्रो म्हणजे सेंट पीटर्स चर्च पाहण्यास खाली उतरल्यावर बसमधून मुख्य सेंट पीटर्स बॅसीलीकाच्या समोर मध्यवर्ती असे अति विस्तीर्ण गोलाकार सीमेंट कॉक्रीटचे अतिविशाल प्रांगण आहे की ज्यात कमीत कमी १०-१५ लाख लोक सहज बसतील. त्या प्रांगणात एका कमानीतून गेल्यावर तेथे मध्यभागी अति ऊंच निमुळता स्तंभ आहे. चारी बाजू गोलाकार अति उंचीच्या भिंती व त्यात येण्याजाण्यासाठी कमानी असलेले भव्य प्रवेशद्वार आहे. त्या अतिउंच असलेल्या निमुळत्या मनोऱ्याकडून सेंट पीटर्सच्या मुख्य प्रवेशद्वाराचे दर्शन घेतल्यावर गॉथिक शैलीत असलेल्या त्या वास्तूची भव्यता जाणवते नि मन त्या कला वैभवाने दडपून जाते.

या व्हॅटिकनचे खरे सामर्थ्य ग्रेगरी द ग्रेट या पोपने इ.स. ५९० मध्ये रोमला घातलेला वेढा उठविला, तेव्हापासून वाढले. या घटनेपासून पोपच्या सामर्थ्याचा पाया घातला गेला. अशा प्रबल धर्मसत्तेचे म्हणजे पोपचे मुख्य प्रशासकीय व अध्यात्मिक केंद्र बनले होते ते व्हॅटिकन सिटी!

धार्मिक दृष्ट्या हिंदू मध्ये काशी, मुस्लिमांत मक्का, मदीनाचे जे महत्त्व आहे तसेच महत्त्व व्हॅटिकन (पोपचे धर्म सत्तेचे) किंवा रोमन कॅथॉलिक / ख्रिश्चन यांच्या मध्ये आहे. व्हॅटिकन सिटीला पोपचे स्वायत्त राष्ट्र समजले जाते. एकेकाळी युरोपावर आपली सत्ता गाजविण्याऱ्या पोप, या प्रमुख राज्य व धर्मसत्तेचा अंत होण्याची सुरूवात प्रबोधनकाळापासून (इ.स. ११०० ते १४००) झाली नि शेवटी या धर्मसत्तेचे राज्यकारभार विषयक वर्चस्व संपूर्णपणे

---

इटलीच्या एकीकरणाच्या काळांत (१७९५-१८७०) संपुष्टात आले. तेव्हा इटालीयन लोकांना वाटू लागले. एवढे मोठे पोपचे साम्राज्य ज्याने अनेक शतकें युरोपावर अधिराज्य केले ते आज जरी लयास गेले असले तरी पोप या धर्मसत्तेचे कांहीतरी प्रतीकात्मक असे ऐतिहासिक स्वरूप व स्थान राहिले पाहिजे, म्हणून रोमन शहराच्या वायव्येस टायबर नदीच्या किनाऱ्यालगत १०८ एकराच्या भूखंडावर जगातील सर्वांत लहान अशा व्हॅटिकन सिटीची स्थापना केली. या व्हॅटिकनला स्वतंत्र (स्वायत्त) देशाचा दर्जा देण्यात येऊन त्या देशाचा प्रशासकीय प्रमुख, त्याचप्रमाणे जगातील सर्व ख्रिश्चनांचा प्रमुख अशा अध्यात्मिक )धर्मगुरू पोपला सर्व देशांनी मान्यता दिली. एखाद्या देशाचा प्रमुख (अध्यक्ष/राष्टपती) जसा असतो तसा दर्जा जगातील सर्व राष्ट्रे व्हॅटिकनच्या पोपला देतात. अमर्याद सत्ता व जगातील चर्चेसकडून येणाऱ्या अगणित संपत्तीमुळे पोपचे महत्त्व सर्व राष्ट्रे मानतात. सुरुवातीला या व्हॅटिकनची लोकसंख्या फक्त १२०० होती आता ती लाखापेक्षा जास्त आहे. स्वतंत्र देशाप्रमाणे येथे लॅटिनला राष्ट्रभाषेचा दर्जा दिलेला आहे. या देशाचा स्वत:चा असा पिवळ्या रंगाचा राष्ट्रध्वज असून त्यावर पोपच्या राजमुगुटाचे चित्र आहे. या अति गर्भश्रीमंत पण चिमुकल्या अशा या देशात स्वतंत्र असे टपाल खाते, दूरदर्शन, आकाशवाणी केंद्र जसे आहे तसेच एक स्वतंत्र असा तुरूंग (जेल) पण आहे. व्हॅटिकनचे एक देखणे नि भव्य असे ग्रंथालय आहे. त्याची स्थापना १४४७ मध्ये पोप निकोलस (पाचवे) यांनी केली. येथे नऊ लाखांपेक्षा अधिक ग्रंथ असून लॅटिनमधील ६० हजार प्राचीन व दुर्मिळ हस्तलिखिते जतन केलेली आहेत. येथे ३५० मीटरचा एक शोभेचा रेल्वेमार्ग आहे. त्याचा उपयोग केवळ व्हॅटिकन व इटाली (रोम) दरम्यान माल वाहतुकीसाठी होतो. अशी ही व्हॅटिकनच्या पोपची आजची सत्ता राज्यकारभार विषयक नामधारी असली तरी एकेकाळी (इ.स. ४७६-११००) ५००-६०० वर्षे तिचा अंमल युरोपावर होता. बायझंटिन (इ.स. ३३०) राजाचा धर्म रोमन कॅथलिक होता व रोम येथे पोपची सत्ता दृढ होऊ पहात होती या सुरुवातीच्या काळात (इ.स. ३३०) शासक ख्रिस्ती झाले पण येशू ख्रिस्ताचे जे चांगले (बंडखोर) विचार धर्मासंबंधी होते त्यास तिलांजली देऊन शासक हे परमेश्वर व सामान्यजन यांच्यात जणू काही दलालांचे काम (धर्मकांडासंबंधी) करू लागले असे पोपच्या धर्मसत्तेत निर्माण झाले मुळांत पोप म्हणजे येशूच्या बालकांची (कॅथॉलिक बांधव) दुःखे दुर करणारा धर्मगुरू ! प्रेषित येशू ख्रिस्ताच्या बारा अनुयायांपैकी सेंट पीटर एक रोममध्ये होता. त्याने जे चर्च बांधले ते म्हणजे सध्याचे (San Pietro) सॅन पॅट्रो सें पीटर्स चर्च ! या अनुयांयापासून पोपची प्रथा सुरू झाली. सध्याचे पोप जॉन पॉल (२रे) हे २६४ वे पोप ६ ऑगस्ट १९७८ पासून त्यांच्या पदावर आहेत. असे हे व्हॅटिकनचे सेंट पीटर्सचे जगातील सगळ्यात प्राचीन चर्च आहे.



**San Pietro**

पुढील काळांसाठी घुमट रचनेचा आदर्श घालुन देणारा महान शिल्पी तसेच चित्रकार मायकेल अँजेलो (१४७५-१५६०) याने आपल्या आयुष्यातील शेवटची ३ वर्षे रोममध्ये घालविली. आपल्या उतारवयात त्याने सेंट पीटर्स चर्चचा घुमट उभारला. आदर्श वास्तुरचनेचा उत्तम नमुना म्हणून ह्या सेंट पीटर्सच्या घुमटाची आज गणना केली जाते.

आधारतीराशी खिळविलेल्या दुहेरी स्तंभावर अंडाकृती उथळा अतिशय भक्कम असून त्याच्या कोपऱ्यांत लहान लहान असे आधार घुमट बांधलेले आहेत. मुख्य घुमट हा द्विकवची असून त्यापैकी अंतर्कवच अर्ध गोलाकार व बाह्यकवच टोकदार आहे. या घुमटाच्या वर पर्यटकांना जाण्यासाठी काही भाग (Lift) ३००० लीराचे तिकीट काढून जाण्याची व्यवस्था आहे. वर गोलाकार या अंडाकृती घुमटाभोवती फिरल्यावर रोम या मायानगरीचे विहंगम दृश्य पाहिल्यावर डोळ्यांचे पारणे फिटल्यासारखे वाटते. या घुमटावर उभे राहिल्यावर असे आढळून येते की रोम शहर सर्व बाजूंने विस्तारित झालेले आहे. त्यामुळे घुमटावर सर्व बाजूने सारख्या इमारती, रस्ते, चर्चेस तर आग्नेयबाजूस रोमा टर्मीनीची रेल्वे स्टेशन, रोम विद्यापीठ दिसतात. वळणे घेत रोम शहरातून जाणारी टायबर नदी तर तिच्या निळ्याशार पाण्याने लक्ष वेधून घेत होती. या सेंट पीटरच्या आत भिंतीवर व गाभाऱ्यावर अनेक नामवंत चित्रकारांनी धार्मिक विषयांवर काढलेल्या चित्रवेचक कलाकृती पहावयास मिळतात. या चर्चेलगत पोपचे निवासस्थान म्हणजे राजप्रासाद ज्याला 'व्हॅटिकन पॅलेस' म्हणतात, तो आहे . त्यात एक हजाराहून अधिक दालने आहेत. तेथे अनेक शिलालेख मायकेल अँजेलो, राफएल, लिओनार्दो द व्हिंची सारख्या तैलबुद्धीच्या प्रख्यात चित्रकारांच्या कुंचल्यातून साकारलेल्या अनेक कलाकृती आहेत. लिओनार्दो द व्हिंचींची (१४४२-१५१९) प्रसिद्ध कलाकृती म्हणजे मोनालिसा. एका स्त्रीचे हे प्रतिभा चित्र असून त्यास काल्पनिक गिरीप्रदेशाची पार्श्वभूमी आहे. अत्यंत काळजीपूर्वक रेखाटलेले हात व डोळ्यामधील चैतन्यपूर्ण भावदर्शन यामुळे या चित्रात जिवंतपणा आलेला आहे. सध्या हे चित्र फ्रांसमधील लुव्र या म्युझियममध्ये संग्रहित केलेले आहे. सेंट पीटर्स चर्चजवळील अजून एक प्रेक्षणीय शिल्प म्हणजे 'सिस्टाईन चॅपेल' . दुसरे पोप (ज्यूल्स) यांचे हे निवासस्थान होते. या पॅलेसचे संपूर्ण छत व दर्शनी भिंतींवर मायकेल अँजेलोने काढलेल्या अप्रतिम चित्रकृती आहेत. या महान चित्रकाराने काढलेल्या चित्रशिल्पात विश्वनिर्मिती, प्रलय, अध:पतन या बायबलमधील विषयावर काढलेल्या चित्रांपैकी - ''क्रिएशन ऑफ आदाम' (Creation of Adam) ही कलाकृती अत्यंत मनोवेधक आहे. आदाम हा जमिनीवर लवंडलेला असून तो परमेश्वराच्या हस्तस्पर्शाने जिवंत होतो आहे हे मोठ्या मार्मिक खुबीने चित्रीत केले आहे. रोमा टर्मीनी या मध्यवर्ती रेल्वे स्टेशनची जगातील सर्वांत मोठ्या व सर्वांत सुंदर स्टेशनांमध्ये गणना होते.

**रोम शहरांतील प्रेक्षणीय स्थळे :**


व्हॅटिकनला सतत दोन दिवस भेटी देऊन तेथील राजप्रसाद चर्चेस शिल्पे व नामवंत चित्रकारांनी काढलेल्या मनोवेधक चित्रकृतीच्या आठवणींचा व स्मृतींचा खजिना जतन करीत रोम शहर पाहण्यासाठी रोमा टर्मीनोपासून सुरवात केली. साधारणत: १ किमी. अंतर रोमचा नकाशा हातात धरून चालल्यावर इटालीतील संरक्षण खात्याची एरोनॉटिकल रीसर्च इन्स्टिट्यूटची भव्य वास्तू लागले. त्याच बाजूला थोडे १-२ फर्लांग अंतर चालल्यावर रोम विद्यापीठाचे अति मोठे प्रवेशद्वार लागले. रोम विद्यापीठास इटालीत 'सॅपिएन्सा युनीव्हर्सीटी रोमा' असे म्हणतात. प्रबोधनकाळाच्या सुमारास म्हणजे इ. स. १३०३ मध्ये या विद्यापीठाची स्थापना आठव्या बॉनिफेस पोपच्या हस्ते झाली. इटालीतील उच्च शिक्षणाचे सर्वांत मोठे असे हे विद्यापीठ असून येथे कला, वाणिज्य, विज्ञान, विधी इतर अनेक ज्ञानशाखा स्थापून अभ्यासकांची फार मोठी सोय केलेली आहे. या विद्यापीठांतील वनस्पतिशास्त्र विभागास Vegetable Science Dept. म्हणतात. त्याचे विभागप्रमुख प्रोफेसर कार्लोब्लासी यांनी स्वागत करून तेथील पर्यावरण शास्त्रातील संशोधनाची माहिती दिली.

---

ज्या माणसाला हे आयुष्य अर्थहीन वाटते तो जगण्यास लायक नसतो.

१५व्या शतकात फ्लोरेंसप्रमाणे रोम शहर हे कलेच्या पुनरुज्जीवनाचे एक महत्वाचे केंद्र बनले होते. याच शहरात लिओनार्दो द व्हिंची, मायकेल अँजेलो, रॅफएल, दोनातेला इ. नी रोमच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घातली. या रोम शहरात नऊ सार्वजनिक ग्रंथालये सुमारे ३० लाख ग्रंथांनी समृद्ध आहेत. रोमची प्रसिद्ध अशी चित्रनगरी सिनेसिटा म्हणजे सिनेमा सिटी ही एक महत्त्वाची चित्रपट निर्मितीचे केंद्र बनली आहे. जागतिक चित्रपट निर्मितीमध्ये हे आघाडीवर आहे. रोमला दोन विमानतळ आहेत. एक आहे तो नैऋत्येस २४ किमी. अंतरावरील लिओनार्दो दि. व्हिंची विमानतळ व २ रा आग्नेयेस ११ किमी. अंतरावरील असलेला चापीना विमानतळ.

१५ व्या शतकांत रोममध्ये एक अतिशय देखणी वास्तू बांधली गेली तो म्हणजे व्हेनेत्सा राजप्रसाद ! इटालीचा फॅसीस्ट म्हणून गाजलेला हुकुमशहा बेनितो मुसोलिनी याने १९२०-३० या काळांत आपले फॅसीस्ट कार्यालय या राजवाड्यात स्थापिले होते. या राजवाड्यात कलासंग्रहालय आहे.पूर्वीचे रोमन सम्राट व पोप या राजप्रासादात रहात होते. तो म्हणजे क्विरिनल राजप्रासाद ! आता हा राजप्रासाद इटालीच्या राष्ट्राध्यक्षाचे निवासस्थान बनला आहे. तसेच मेदिची घराण्याच्या मालकीचा जो राजप्रासाद आहे. त्याचे नाव आहे मदामा ! या मध्ये १८७१ पासून इटालीची लोकसभा भरते. रोममध्ये असे अनेक चर्चेस, राजप्रसाद पाहण्यासारखे वास्तु आहेत तसेच येथे ट्रेव्ही फाउंटन, पिएझा नॅव्होना (Piazza Navana), लॅक्स जुदुर्न, पिअझ्झा एसेद, इ. कांही कारंजी प्रेक्षणीय आहेत. या पैकी भारतीय वकिलातीच्या जवळ म्हणजे २० सप्टेंबर रोडपासून साधारणत: दीड किमी. अंतरावर असणारा ट्रेव्ही फाउंटन पाहण्यास गेलो. पोपचे ऐतिहासिक स्मारक म्हणून इ.स. १७६२ मध्ये हा कारंजा बांधण्यात आला. त्या वास्तूची रचना निकोलाय सालवीने केली. कारंज्याच्या पार्श्वभूमीवर उधळलेले घोडे अडविणारे रोमन योद्धे यांची शिल्पे दाखविली आहेत. हा कारंजा पाहिल्यावर संध्याकाळी ५-६ वाजता आपल्या भारतीय वकिलातील कौन्सीलर श्री. माथूर यांना भेटलो.



Fontana Di Trevi

रोममध्ये विविध स्थळे बघितली हे सांगितल्यावर त्यांनी विचारले की ट्रेव्ही फाउंटनमधे पाठमोरे होऊन नाणे फेकले की नाही ? मी सांगितले 'नाही फेकले'. माथुर म्हणाले की, 'अशी आख्यायिका आहे की नाणे पाठमोरे होऊन टाकले की मनोकामना पूर्ण होते. तसेच रोमला येण्याची संधी मिळते.' तेव्हा ते मला म्हणाले अजून बराच वेळ आहे. तुम्ही परत ट्रेव्ही फाउंटनला जाऊन पाठमोरे होऊन नाणे फेकून या. तुम्हाला रोमला परत यायला पुन्हा संधी मिळेल! तेव्हां परत ट्रेव्ही फाउंटनला जाऊन ५०० लिराचे नाणे पाठमोरे होऊन फेकून मी परत माझ्या निवासस्थानी म्हणजे हॉटेल एलीदी मध्ये परतलो.

इटालीत इतिहास पूर्व कालापासून ते आजपावेतो म्हणजे गेल्या २३०० वर्षात झालेल्या अनेक घडामोडी व स्थित्यंतरे रोम शहराने अनुभवलेली आहे. त्यामुळे या महानगरीच्या सांस्कृतिक जीवनात जशी आधुनिकता आढळते तसेच महान ऐतिहासिक परंपराचा वारसा लाभलेला आहे. येथे जशी भव्य नाट्य गृहे, स्नानगृहे आहेत तशीच अतिप्राचीन ऐतिहासिक वास्तू चौक (फोरम), स्तंभ (कॉलम), क्रीडाप्रेक्षागृहे पहावयास मिळतात. प्राचीन रोमन

जीवनाचा अविभाज्य घटक म्हणजे फोरम. (मोठ मोठे मोकळे चौक). रोममधील सर्वात महत्त्वाचा फोरम म्हणजे 'रोमन फोरम' हा होय ! हा रोमन शासनाच्या केंद्रबिंदू होता. रोमन फोरममध्ये क्युरीआ 'सिनेटहाऊस', सेप्टीमस सव्हींसची भव्य विजय कमान, टॅम्पल ऑफ सॅटर्न आणि बॅसिलिका ज्युलिया (विश्राम गृह) हे सर्व भग्नावस्थेत पहावयास मिळतात. अनेक रोमन सम्राटानी आपापल्या नावाचे चौक (फोरम) बांधले आहे. आगस्टस, ज्युलिअस सिझर, नर्व्ह, ट्रेजन व व्हेस्पेश्यन या रोमन सम्राटाचे फोरम भग्नावस्थेत अद्यापी टिकून आहेत. या वरील फोरम पैकी इ.स. च्या २ऱ्या शतकांत बांधलेला सर्वोत्कृष्ट फोरम म्हणजे 'ट्रेजनचा फोरम' हा होय. या फोरम मध्ये भग्नावस्थेत रोमच्या प्राचीन वैभवाची साक्ष देण्याऱ्या वास्तू म्हणजे बॅसिलिका उल्पिया, टेम्पल ऑफ ट्रेजन हा होय. याच ट्रेजन फोरम मध्ये ३० मीटर उंचीचा 'ट्रेजन कॉलम' हा अद्यापी अभंग स्वरुपात दिमाखात उभा आहे.

जर्मन (इ.स. १७१-१७३) व सारमॅटिक (Saermatic) (इ.स. १७४-७५) याच्या मधील युद्धातील राजाच्या विजयाच्या स्मरणार्थ द कॉलम ऑफ Marcus Aurelins चे बांधकाम इ.स. १८०-१९६ या काळात बांधल्या गेल्या. या स्तंभावर वीस सर्पीलाकार ओळीत वरील युद्धाच्या विजयाची गाथा व दृश्ये अत्यंत सुशोभितपणे कोरलेले आढळतात. त्याचजवळ 'मार्कीटस ऑफ ट्रेजन' या नावाची अर्धवर्तुळाकार असलेल्या तिमजली दुकानाची भग्नावशिष्ट वास्तू आहे. या मधील एक दुकान गतकाळाचा स्मरणार्थ पुनःश्च पूर्वकालीन स्वरुपात उभारण्यात आलेले आहे.

**क्रीडाप्रेक्षागृहे :**

एक दिवस रोम शहरात ट्रेव्ही फाउंटन (कारंजा) ला भेट दिल्यानंतर रस्त्याने चालत असताना थोड्या वेळाने एक भला मोठा चौक लागला. तो म्हणजे ट्रेजन फोरम ! ह्याच ट्रेजन फोरमच्या बाजुबाजुने एक मोठा दुपदरी रस्त्याने चालत जात असता उजव्या बाजुस जुन्या अतिप्राचीन पण भग्नावस्थेत कांही वास्तु व कॉन्स्टंटटाईनची कमान दिसते न दिसते तोच एक अति भव्य, अर्ध भग्न अवस्थेतील वर्तुळाकार लालसर भगव्या रंगाची वैशिष्टपूर्ण वास्तू नजरे समोर येते, ती म्हणजे रोमचे अति प्राचीन कॉलोसिअम (Colosseum) वास्तू मागे द्वंद युद्धाच्या सुमारे २ हजार वर्षांचा इतिहास आहे. या वास्तूतील प्रत्येक वीट नि प्रत्येक दगड हे रोमन काळांतील इतिहासाचे महान साक्षीदार आहे.

प्राचीन रोममध्ये इ.स.पूर्व २६४ मध्ये द्वंद युद्धे खेळणाऱ्या योद्धांना ग्लॅडिएटर (Gladiator) म्हणत. रोमनांनी हा खेळ इट्रुसकनापासून घेतला असावा. रोममध्ये १ल्या सामन्यात ३ जोड्यानी भाग घेतला. नंतर सर्व रोमन साम्राज्यात हा खेळ लोकप्रिय झाला. माणसा माणसामधील द्वंदाशिवाय पुष्कळदा माणसांना (म्हणजे देहांताची शिक्षा झालेल्या, युद्ध कैद्याना, गुन्हेगार, गुलाम इ.) अतिहिंसक, क्रूर प्राण्यांबरोबर लढविले जाई. या खेळापूर्वी कांही दिवस हिंसक प्राण्यांना सिंह व उन्मत्त किंवा माजलेला बैल यांना मुद्दाम उपाशी ठेवत असत. जो योद्धा या क्रूर प्राण्यावर मात करून विजयी ठरत असे. त्यास राष्ट्रवीर (Gladiator) म्हणून गौरव करून समाजांत आदराचे स्थान दिले जात असे. असा हा असिक्रीडकाचा (रोमन ग्लॅडीएटर) खेळ सर्वप्रथम रोम मध्ये इ.स.पूर्व २६४ मध्ये मार्कस व ॲलबायनस ब्रुटस या दोन भावांनी आपल्या वडीलाच्या अंत्यसंस्काराच्या वेळी द्वंदयुद्ध करविले तेव्हांपासून सुरु झाला. पुढे हा खेळ इटालीतील सर्व थराच्या लोकांमध्ये लोकप्रिय झाला. या खेळापायी हजारो प्राण्यांची हत्या होऊन शेकडो कैदी, गुलाम मरण पावत. ऑगस्टस ट्रेजन, टायटस इ. सम्राटांनी या करमणुकीच्या खेळात विशेष रुची दाखविली. रोमन लोकांची रक्ताची तहान पशूंच्या वेदना पाहून भागत नसे. म्हणून त्यांनी खास शिक्षण देऊन तयार केलेल्या दोन गुलामांना द्वंद युद्धा जुंपत. त्यांच्या निर्दय

डोळ्यासमोर जेव्हा रक्ताच्या चिळकांड्या उडत तेव्हां हे रोमन प्रेक्षक आनंदाने बेहोष होत. एखादा असिक्रीडक लढता लढता मरण पावला तर तात्काळ त्याचे शरीर फरफटत ओढून बाजुला करून त्या ठिकाणी दुसरा इसम आणून प्रेक्षकांची करमणूक केली जात असे. असे सामने तीन तीन महिने चालत असत. सम्राट थीओडोशियसने मात्र आत्मसंरक्षणार्थ सुद्धा सिंहाचा वध करण्यास कायद्याने बंदी घातली. असिक्रीडक तयार व्हावे म्हणून रोमनकाळांत असिक्रीडकांच्या शाळा उघडण्यात आल्या. या योद्धांना ग्लॅडीएटरनां (Gladiator) हौसेकरता व शरीररक्षक म्हणून श्रीमंत लोक आपल्या पदरी ठेवत तसेच राजाश्रय पण मिळे. कॅलिगुला या सम्राटाच्या शाळेंत वीस हजार ग्लॅडीएटर होते. विजयी योद्धांना रत्नजडित शिरस्त्राणे इ. बक्षिसे मिळत. तोंड व डोके झाकणारे शिरस्त्राण व आखूड हाताचा लाल अंगरखा घालून हातात तलवार व ढाल घेऊन हे योद्धे जमिनीवरून व रथातून द्वंद खेळत. हल्ली त्या काळातील रोमन सैनिकांची कल्पना यावी म्हणून कॅलॉसिअमच्या प्रवेशद्वाराजवळ रोमन सैनिकाचा ग्लॅडीएटरचा उपरोक्त उल्लेखिलेला वेष परिधान करून घोड्यावर बसलेले सैनिक तिथे होते. पर्यटक हौस म्हणून त्याच्याबरोबर स्वत:चे फोटो काढून घेऊन स्वत:ची हौस भागवून घेतात. साधारणपणे या द्वंदात एकाचा मृत्यू झाल्यास दुसरा विजयी ठरत असे. गंभीरपणे जखमी झालेला योद्धा जीवनदानासाठी अंगठ्याजवळील बोट वर करी. प्रेक्षकांच्या दयेस प्राप्त झाल्यास ते हातरुमाल हालवीत अन्यथा हाताचे अंगठे खाली करीत. हल्लीचे जे भग्नावस्थेत असलेले जे कॉलॉसिओम आहे त्याच्या बांधणीची सुरुवात पहिल्यांदा इ.स. पू. ७०-८० या काळांत झाली. त्यात मध्य भागी अंडाकृती क्रीडांगण व भोवती प्रेक्षकांकरता बांधलेली दगडी व लाकडी उतरंडी अशा प्रकारची रचना असे. त्या भोवती दगडी तट बांधल्याने बाहेरून जसे काही या एखाद्या किल्ल्याच्या भिंती असल्या सारखे भासते. कॉलॉसिओ या प्रसिद्ध क्रीडाप्रेक्षागारांत सुमारे १०,००० प्रेक्षक बसण्याची व्यवस्था होती. कित्येकदा या योद्धांना त्यांच्या मालकांच्या (सरदार, राजे, जमीनदार) यांच्या विचित्र व आसुरी आनंदासाठी मुद्दाम अनेक दिवस उपाशी ठेवलेल्या सिंहाशी किंवा माजलेल्या बैलाशी झुंज द्यावी लागत असे. ह्या विकृत रंजनाच्या लालसेतून आसुरी क्रौर्य या खेळांत निर्माण झाले. इ.स. ३२५ मध्ये कॉन्स्टंटाईनी ही क्रूर क्रीडा पद्धती बंद करण्याचा प्रयत्न केला, नि शेवटी तिचे उच्चाटन पाचव्या शतकात झाले.



Colosseo

या कॉलॉसिओ जवळ एक भुयारी रेल्वे मार्ग आहे. या भुयारी मार्गातील रेल्वे स्टेशनचे नांव पण कॉलॉसिओच आहे. आत सर्व स्टेशन वातानुकुलित, शांत व स्वच्छ पाहून कलकत्याच्या मेट्रो रेल्वेच्या दुरावस्थेची आठवण झाली. येथून रोमाटर्मीनीला भुयारी मार्गाने केवळ १५ मिनिटात पोहोचलो.

गर्भश्रीमंत रोमन नागरिकांची स्वत:ची अशी स्नानगृहे होती तसेच सार्वजनिक स्नानगृहेपण होती. रोमन सम्राटाची सार्वजनिक स्नानगृहे हे विलासी स्वरुपाची होती. त्यांचा आकार एखाद्या चौकोनी पोहोण्याच्या तलावा सारखा होता. त्या भोवती उद्याने, स्तंभयुक्त आरसपानी द्वार मंडप असे. त्यामध्ये थंड, गरम व वाफेच्या स्नानाच्या व मालिश करण्याच्या सोई होत्या.

इतिहास प्रसिद्ध सार्वजनिक स्नानगृहे म्हणजे कॅराकेला व डायोक्लीशन ! कॅराकेला हे इ.स. च्या २ऱ्या शतकात बांधले गेले असून ते अप्रतिम व भव्य आहे. ते मौल्यवान संगमरवर, पुतळे इ. नी सुशोभित केलेले आहे. उन्हाळ्यात सादर करण्यात येणाऱ्या संगीतिका व पार्श्वभूमी दृश्ये म्हणून त्यास महत्त्व दिले गेलेले आहे. डायोक्लीशन हे स्नानगृह (इ.स. ३रे शतक) हे सर्व रोमन स्नानगृहांत सर्वांत मोठे समजण्यात येते. एकेकाळी त्यांत ३००० लोक स्नान करीत असत.

**खास उल्लेख :**

रोममधील वास्तव्यात पाहिलेली तसेच पेरुजीया, फ्लोरेंस, पादुआ, व्हेनिस नि पिसा येथे पाहिलेली स्थळे, त्या मागची ऐतिहासीक पार्श्वभूमी या संबंधीचे आतापावेतो लिहिलेल्या लेखातील लिखाण प्रत्यक्षात आले आहे ते केवळ विद्याप्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर व कार्याध्यक्ष श्री. अचलकुमार टिल्लू यांच्या सातत्यपूर्वक प्रेमळ आग्रहामुळे ! मा. संचालक उच्च शिक्षण व तंत्रज्ञान महाराष्ट्र शासन यांची सक्रीय आर्थिक मदत तसेच महाराष्ट्र राज्याच्या प्राथमिक शिक्षण परिषदेचे संचालक श्री. मोहनराव आपटे, मुंबई विद्यापीठाचे माजी प्रकुलगुरु डॉ. नरेशचंद्र व मुंबईचे आमचे एक मित्र डॉ. जेमीनीभाई ओझा या सर्वांनी मन:पूर्वक सर्व प्रकारचे सहकार्य केले नसते तर ही इटालीची सफर अशक्यप्राय झाली असती. म्हणूनच या सर्वांचा हा खास उल्लेख !

**डॉ. ग.त्रिं. दाभाडे**
वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख,
बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

• • •

*With Best Compliments From*

A
WELL
WISHER

*With Best Compliments From*

SHREE NETRA OPTICS

1, Vadke House,
Opp. Maltibai Hospital,
Veer Savarkar Marg,
Thane (w) 400 601.

आत्मसन्मान, आत्मज्ञान आणि आत्मनियंत्रण या तीन गोष्टींमुळेच तुम्हाला तुमच्या जीवनात सर्वोच्च शक्ती प्राप्त होणार आहे.

# सरत्या शतकातील महान व्यक्ती

कु. शिल्पा पाटील

*(याच शीर्षकाचा एक लेख आपण एप्रिल २००० या अंकात वाचला होता. त्याच स्पर्धेत दुसऱ्या स्पर्धकाचे महात्मा गांधी संबंधात व्यक्त झालेले विचार या लेखात आहेत. - संपादक)*

११व्या शतकापासून, २०व्या पर्यंतचा होता विचार
स्थित्यंतरे झाली अनेक अपार
यशापयशाचे झालेत उच्चार
राखेचे आता उरलेत आभार
मानायचेत 'ते' करून सहस्त्रकाचा स्वीकार

या सहस्त्रकाचा म्हणजे ११व्या शतकापासून ते २०व्या शतकापर्यंत प्रवास पाहता अनेक स्थित्यंतरे झालेली दिसून येतात. त्यात राज्यक्रांत्या झाल्या, वैचारिक क्रांत्या झाल्या, औद्योगिक क्रांत्या झाल्या. या क्रांत्यांमध्ये कोणीतरी प्रेरणास्थान होती, कोणीतरी आदर्श होते. जसे १५व्या शतकातील धर्मशास्त्र तत्त्ववेत्ता मार्टीन ल्यूथर किंवा १६व्या १७व्या शतकातील फ्रेंचविचारवंत 'मॉटेस्क्यू' 'व्हॉल्टेअर' १८व्या शतकातील फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्गाता 'रुसो' जर्मन समाजवादी विचारवंत 'कार्ल मार्क्स' १९व्या शतकातील रशियन राज्यक्रांतीचा उद्गाता 'लेनिन' दुसऱ्या महायुद्धातील इंग्लडच्या विजयाचा शिल्पकार 'विन्स्टर्न चर्चिल' भारताला स्वातंत्र्य मिळवून देणारे 'महात्मा गांधी', अखिल मानव जातींची सेवा करणाऱ्या 'मदर तेरेसा' अमेरिकेला २० व्या शतकातील महासत्ता बनवणारे 'बिल क्लिंटन' आणि संगणकाचा जनक 'बिल गेटस्' या आदर्शातून सहस्त्रकातील महान व्यक्तींची निवड करायची झाल्यास एकच नाव पुढे येते ते म्हणजे महात्मा गांधी. तेच या शतकातील महापुरुष आहेत. कारण महापुरुष म्हणजे जो कालसपेक्ष विचार मांडतो. त्याच्या मृत्यूनंतरही ते विचार शतकानुशतके चिरतन रहातात, नवी दिशा दाखवतात, प्रेरणादायी ठरतात.

लेनिन, विन्स्टर्न चर्चिल, बिल क्लिंटन सारख्या महापुरुषांचा पराभव झाला. लेनिनचा साम्यवान लेनिन सकट गाडला गेला. इंग्लंडच्या अध्यक्षीय निवडणूकीत विन्स्टर्न चर्चिल पराभूत झाले. नीतिमत्तेच्या कबुली जबाबासाठी बिल क्लिंटनना न्यायासना समोर उभे रहावेच लागले. परंतु गांधीजींचे विचार दूरदर्शी आहेत, त्यांच्या नंतरही ते चिरंतन आहेत. हे विचार एक तत्त्वज्ञान ठरले. जगभर त्याचा अभ्यास झाला आणि होत आहे. गांधीजी हे सामान्य जनतेचे मानस समजणारे पुरुष होते. ते योगी किंवा प्रयोगी असतील किंवा नसतील. पण सामान्य जनतेचा मानस समजणारे होते. लोकांची मने जिंकणे, त्यांना अत्यंतिक त्यागाला प्रवृत्त करणे या गोष्टी गांधीजी करू शकले. त्यामुळे सहस्त्रकाला हलवून सोडणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे 'मोहनदास करमचंद गांधी'. ज्यांनी आपल्या समकालीन चिंतकांना, विचारवंतांना, राजकारण्यांना व समाजसुधारकांना प्रवृत्त केले, सर्वाधिक प्रभावित केल.

हा गांधीवाद म्हणजे विशिष्ट विचारपद्धती, विशिष्ट जीवनपद्धती आहे. तो अध्यात्मवादावर अवलंबून आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय व अपरिग्रह हे चार नैतिक नियम त्यांच्या विचारसरणीचा पाया आहे. सत्य हा त्यांचा ईश्वर होता आणि अहिंसा ही त्यांची भक्ती होती.

गांधीजी म्हणतात अहिंसा म्हणजे प्रेम. ती स्वतःच्या व इतरांच्या स्वातंत्र्याचा विचार करते. शरीर व हिंसा यांचा नित्य संबंध आहे. एक बंध आहे. शरीरावरील आसक्ती जितकी अधिक, तितकी हिंसा अधिक त्यामुळे शरीरावरील आसक्ती कमी केली पाहिजे म्हणजे आपोआपच अहिंसा होते. सर्वच प्राणीवर्ग अहिंसक आहे

---

निरुपयोगी जीवन म्हणजे लवकर आलेला मृत्यूच असे म्हणता येईल.

परंतु मानववंश श्रेष्ठ असल्याने इतर प्राण्यांना बाचवण्याकरिता त्याची हिंसा होता कामा नये. मासाहार वर्ज्य, गोपूजा, वृक्षपूजा हे हिंदूधर्मातील अहिंसेचे उत्कृष्ट प्रत्यंतर आहे असे ते म्हणतात.

या अहिंसेचा आणि सत्याचा जो सिद्धांत मांडला तो म्हणजे सत्याग्रह. जो गांधीजींनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात वापरला. सत्याग्रह म्हणजे सत्याकरता अहिंसेच्या मार्गाने असत्याचा प्रतिकार करणे. शुद्ध साध्याकरता शुद्ध साधनेच उपयोगी पडतात, अशुद्ध साधने वापरल्यास साध्यही अशुद्ध बनते. त्यामुळे देश स्वातंत्र्य या शुद्ध साध्याकरिता सत्याग्रह हे शुद्ध साधन गांधीजींनी वापरले. राम, विष्णू, कृष्ण, महादेव अशा देवदेवतांच्या हातात शस्त्रे होती पण गांधीजी नि:शस्त्राचे राजकारण खेळले. गांधीजींचा हा युगातला एक अभिनव प्रयोग होता. ज्यामुळे संपूर्ण जगाचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. यावरून असे सिद्ध होते की गांधी विचारांचा वापर जेव्हा योग्य रीतीने झाला आहे तेव्हा तो यशस्वी ठरला. नाहीतर ज्या देशात सुईच्या टोकावर मावेल इतक्या जमिनीसाठी महाभारत घडले, त्याच भारतात विनोबांना लाखो एकर जमिन भूदानात मिळाली नसती. पर्यावरण वाचविणारे सुंदरलाल बहुगुणांचे 'चिपको' आंदोलन यशस्वी झाले नसते. कुष्ठरोग्यांची सेवा करणारे बाब आमटेचा जगाने गौरव केला नसता. एकंदरित गांधीजींचे तत्त्वज्ञान एकूण जीवन सरणीवर प्रभाव टाकणार आहे. जीवनाचे एकही क्षेत्र नाही जिथे गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव नाही. उदा. गांधीजींचे अर्थकारण : विशिष्ट नैतिक ध्येयवादास अनुसरुन आर्थिक व्यवहार कसे चालावेत. या संबंधी भारताच्या व जगाच्या आर्थिक व्यवस्थेबाबतचे धोरण म्हणजे गांधीजींची अर्थकारण.

शिक्षण क्षेत्राविषयी सांगताना गांधीजी म्हणतात, शाळा, कॉलेज हे चारित्र्य निर्माण करणारे कारखाने व्हावेत. शिक्षणचा जीवनाशी संबंध असेल तरच ते शिक्षण जीवनदायी ठरेल. तसेच गांधीजी स्त्रीहक्कांविषयीही जागृत होते. त्यांनी महिलांमध्ये सन्मानाची भावना जागृत केली. भारतीय महिलांची शक्ती आणि राष्ट्रभक्ती वृद्धिंगत करण्याचे कार्य गांधीजींनी केले.

गांधीजींचे धार्मिक विचार बघितल्यास त्यांना आधुनिक संत म्हणता येईल. त्यांनी स्वत: कोणताही धर्म स्थापन केला नाही. उदा. आर्य समाज, ब्राह्मोसमाज, प्रार्थना समाज इ. त्यांच्यामते प्रत्येक नवा धर्म हा कडवेपणाला जन्म देतो. म्हणून त्यांनी सर्वधर्मसमभावाची कल्पना विकसित केली.

अस्पृश्यांना घडवताना, त्यांना नागरी हक्क देताना गांधीजी म्हणत सर्व माणसे ही एकाच ईश्वराची लेकरे आहेत. त्यामुळे ती समान आहेत. त्यांचे हक्क समान आहेत. त्यांना प्रतिष्ठाही समान असली पाहिजे.

गांधीजींची तरुणांशी आत्यंतिक जवळीक होती. पंडित जवाहरलाल नेहरु, सुभाषचंद्र बोस, लोकनायक जयप्रकाश नारायण अशा तरुणांवर गांधीजींचे आत्यंतिक प्रेम होते. त्यांचे चातुर्य, कल्पकता, त्यागी वृत्ती आणि संघटन यांचे ते चाहते होते.

असे हे गांधीजी जणू भारतभूमीवरील चालताबोलता सूर्य, निश्चय आणि निश्चलता यांचा चालता बोलता हिमालय, ज्यांनी तत्वांशी कधीही तडजोड केली नाही. आणि हेच त्यांच्या अमरजीवनाचे रहस्य आहे. म्हणूनच म्हणावस वाटते-

युगा युगाचा येता यात्री
पावन झाली भारत माती
स्वार्थाचा कधी शब्द न ओठी
निगर्वी अशी त्याची ख्याती
महानता ही त्यातच होती.

कु. शिल्पा ल. पाटील T.Y.Bsc.
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

• • •

---

प्रत्येकालाच जीवनात माधुर्य आहे असे वाटते.

# लग्न नावाचा धडा

श्री.प्रवीण दामले

*(सहजीवन ही एक परीक्षाच असते. अॅडजेस्टमेंट करण्याची तयारी असेल, लहानसहान बाबींचा विचार करण्याची प्रवृत्ती असेल तर सहजीवन सुखी होऊ शकते.- संपादक)*

मी एक साधा माणूस. माझ्या लग्नाला दीड वर्ष झालं. दीड वर्षात एका छान मुलीचा बाप ही झालो. लग्न या गोष्टी विषयी पुष्कळ विचार करत होतो. त्यामुळे माझं लग्न जरासं उशीराच (माझ्या वयाच्या पस्तिसाव्या वर्षी) झालं. बायको सुविद्य आणि सुजाण मिळाली. आमचा प्रेम विवाह. त्या मुळे काही गोष्टी सुरुवातीपासून सोप्या गेल्या. तरीही दीड वर्षे वयाचं माझं इवलसं लग्न. त्याच्या कडे पाहता वाटायला लागलं की पुष्कळ धडपडायला लागलं. या दीड वर्षा दरम्यान मी अनेक पाठ शिकलो. त्याच्याबद्दल लिहायला पाहिजे.

लग्न या विषयाबद्दल बरबरचं आणि मोघम पुष्कळ बोललं जातं, सांगितल जातं. पाण्यात पडलं की पोहता येतं, यासारखं गाढवपणाचं वाक्य पिढीजात शहाणपणाचं म्हणून सांगितल जातं आणि नाकातोंडात संसाराचं पाणी गेलेले असंख्य लोक गटांगळ्या खातात. माझा एक मित्र म्हणतो पहिल्या रात्री सर्व पुरुषांचं माकड होतं. पण या माकड होण्याची तयारी करून द्यावी असं मात्र फार कमी जणांना वाटतं. लग्न जमवलं की जमवणाराचा मान करतात. पण तेच बिघडलं की जमवणारा मात्र त्याची जबाबदारी घ्यायला तयार नसतो. किंबुहना लग्न ही एक जाणून बुजून, जरा तयारी करून करण्याची गोष्ट आहे याचा विचारच अनेक लोकांच्या डोक्यात येत नाही. लग्नासाठी हजारो, लाखो रुपये उधळणारे पालक निरामय कामजीवन नावाचं शंभर रुपयांचं पुस्तक घेण्याची तरतूद मात्र करीत नाहीत. आमचं नाही का झालं सगळं ? असे म्हणणारे पालक त्यांच काय झालं ते सागांयला कधीच तयार होणार नाहीत आणि या होण्याच्याअंधारात आपल्या मुलामुलीला लोटायला ते अगदी हसतमुखाने तयार होतात अर्थात् गोष्टी दोन्ही बाजूंनी नीट होत नाहीत, हेही खरंच आहे. मुल मुलींनाही. हल्ली हल्ली जरा वाटायला लागलयं की लग्न नावाचा जुगार खेळायचा, की आणखी काही ? मग या जुगाराची बंद दारं किलकिली करण्याची कल्पना पुढे आणणारं साथ साथ सारखं मंडळ निर्माण होतं.

"लग्न म्हणजे अॅडजेस्टमेंट" जुळवून घेण्याची तयारी हवी. समंजसपणा हवा." या एका मोघम वाक्यामधे सुखी संसाराची किल्ली जणू दडपून ठेवली आहे. असं भासवलं जातं. समंजसपणा येण्यासाठी सहजीवन या गोष्टीचा स्वीकार मनापासून करावा लागतो. चोवीस तासांचं आपलं लग्नापूर्वीच जगणं लग्नानंतर कोणाबरोबर तरी वाटून घ्यायचं आहे याचा मानसिक आणि वैचारिक तयारी करायला हवी. आपलं लग्न झालयं याचा विसरच पडला तर सहजीवन निर्माण व्हायलाच अडथळे येतील. लग्न या गोष्टीची मानसिक तयारी म्हणजेच आपलं जगणचं वाटून द्यायचं आणि घ्यायचं आहे. मग आपली काही गुपितं सांगायची. आपल्या जोडीदाराची मनातं ठेवून द्यायची. एकमेकांच्या बारीक सारीक आवडी निवडी जाणून सजग ठेवायच्या (नवऱ्याला जेवणात रोज अमूक पदार्थ लागतो हे लक्षात ठेवायचं बायकोने आणि बायकोला रोज दूध हवं असतं हे मात्र नवऱ्याला माहीत नसेल तर कसं चालेल?) सहजीवन हे जरा कष्टमय असतं. कारण व्यक्ती म्हणून आपला दिनक्रम, मित्र मैत्रिणी, सिनेमेनाटकं, खरेद्या यांची जी गणित असतात त्या पेक्षा वेगळ्या गणितांची मांडणी

तारुण्यात चुका करायच्या, प्रौढत्वात झगडायचे आणि म्हातारपणात पश्चाताप करायचा.

करायची असते. दोघेही जण बाहेर पडणार असतील तेव्हा अचानक आलेल्या तिच्या वा त्याच्या मित्र, नातेवाईकांना योग्य पद्धतीनं स्वीकारवं आणि कार्यक्रम कॅन्सल करावा लागतो म्हणून न धुसफुसण्याची तयारी करायला लागते. जोडीदाराचे जरासे नावडतेच नातेवाईक कौशल्याने आपलेसे करावे लागतात. (बायकोचा मामा मोठमोठ्याने बोलतो म्हणून बायकोवर चिडून उपयोग नसतो. उलट उद्या हाच मामा आपल्या उपयोगाला पडू शकेलं असं लक्षात ठेवावं लागते.) सासरच्या मंडळींचं सारखं भिंग घेऊन आपलं काम पहाणं चालत असलं तर शांतपपणाने पण ठणकावून आपल्या कामाची पद्धती आणि सवय याची कल्पना करुन द्यावी लागते आणि तुलना न करता कामाच्या निकालाकडे, अंतिम ध्येयाकडे पाहण्याची कल्पना द्यावी लागते. कटकट करणाऱ्या सासूबाईंना कदाचित दिवसभर तुमच्याशी खूप बोलायचं असेल. किंवा मुलगा नसणारी सासू जावयाला मुलासारखं वागवून आपली मुलाची आई होण्याची भूक भागवत असेल. असं काहीही असू शकतं. म्हणजे वरवर धूर दिसेल पण खणून पाहिलं तर मायेची उब देणारा निखाराही सापडेल तर तो शोधायला हवा. मी शिकलो तो एक धडा म्हणजे आपल्या सार्वभौमत्वावर हल्ला होऊ देण्याऐवजी सार्वभौमत्वाचा विस्तार करणं. हे 'माझं' आहे ऐवजी हे 'आमचं' आहे याची सवय पाडून घेण्याची गरज असते. जर जोडीदाराला आपण आणि आपलं घर याच्यात जागा सापडली नाही तर तो कशात सामावून घेणार. बायकोच्या साड्या, तिची वह्यापुस्तकं, फायली यांच्यासाठी वेगळी जागा द्यायला हवी. तिच्यासाठी नवे पांघरुण, नवा टॉवेल मुद्दामहून घ्यायला हवा. तिच्या आवडीचं घरुन आणलेलं (कळकट्टं) पांघरुण तिचं म्हणून चेहरा न सुरकुतता स्वीकारायला पाहिजे.'हे आपलं आहे अशा भावनेची निर्मिती सहजीवनाच्या पायासाठी गरजेची असते. मग नवऱ्याची (वावळट) मैत्रिण आपली म्हणायची, तिचा गवाळेपणा नजरे आड करायाचा. आणि त्यांच्या मैत्रीच मूळ शोधून पहायचं. कदाचित ती बायकोचीही जवळची मैत्रिण होऊन जाईल. (तसं नाही झालं तरी मैत्रिणपणाचा तिचा अधिकार सरळपणानं स्वीकारायला हवा.)

'थोडे द्यावे, थोडे घ्यावे तेव्हा प्रिती जुळे, जिवाचा जिवलग तेव्हा मिळे'' असं एका गाण्यात म्हटलय. त्याच मर्म लक्षात यायला हवचं. मग मागच्या उदाहरणातलं कळकट पांघरुण स्वच्छ करण्याची आणि आपल्या बावळट मैत्रिणीला थोऽऽडं शार्प करण्याची जबाबदारी ही आपल्या जोडीदार या भूमिकेच्या सार्थतेसाठी आपली जबाबदारी ठरते.

समंजसपणा म्हणजे काय ? या प्रश्नाच्या उत्तराची व्याख्या करता यायला हवी आणि ती सुद्धा एकमेकांच्या जवळ जाणारी हवी. नवऱ्याचा समंजसपणा म्हणजे बावळटपणा आणि बायकोचा समंजसपणा म्हणजे शेळी असं नको. एकमेकांच्या सोबत रहायचं तर थोडं एकमेकांना घडायला आणि घडवायला मदत करण्याची तयारी करणं म्हणजे समंजसपणा असा एक साधा मध्यममार्ग निघेल का? खूपदा आपल्याला जे म्हणायचं तेच जोडीदाराच्या रुसण्या रागावण्याच्या मुळाशी असेल तर किती सुख वाटेल. मात्र त्यासाठी रागावण्यात वाहून न जाण्याची काळजी घ्यायला लागेल. अनेकदा भांडणाचा मूळ मुद्दा बाजूला राहून एकमेकांना ओरडण्यातच शक्ती व्यर्थ होत असते. त्याऐवजी माझं चुकतं, पण माझी भावना ही होती हा साधा मंत्र एकमेकांमधला संवाद विकसित करेल. समंजसपणा म्हणजे स्वतःच्या चुका आणि त्रुटी स्वीकारणं आणि जगात कुणीच परिपूर्ण नसतं हे सुद्धा स्वीकारण होय.

**स्त्रियांच शोषण एक समजून घेणे.**

बायकोच्या बाळंतपणाच्या नंतरच्या दिवसात ''एवढं काय करते ही दिवसभर'' असं माझ्या मनात यायचं.

---

जेव्हा कोणताही माणूस कामच करणार नाही त्यावेळी या जीवनाची काळरात्रच सुरू होईल.

एकदा एका परिषदेला बायकोला जायच होतं. मी म्हटलं मी सांभाळीन मुलीला दिवसभर. त्या दिवसभरात सोबत म्हणून वाचण्यासाठी एक पुस्तक, लेखनासाठी पॅड पेनही मी सोबत ठेवलं होत. अखेर संध्याकाळ पर्यंत माझा त्या दिवशीचा पेपर सुद्धा नीट वाचून झाला नव्हता. हा अनुभव मला चांगलाच धडा देणारा ठरला. आता काही ' रांधा वाढा उष्टी काढा शिवा टिपा अन मुले जपा ' छापाच्या मुली असतील तर त्यांना यातच धन्यता वाटत असेल तर त्याला कुणी काय करावं.

उषाकिरणबाईंची मुलाखत होती टीव्हीवर. त्यांना टिपीकल प्रश्न विचारला गेला, जेवण बनवण्याबद्दल. त्या म्हणाल्या, '' मला जेवायला आवडते. जेवण बनवायला आवडत नाही.'' अशा अनेक जणी असतील का ? की ज्यांना असं सांगता येत नसेल. आणि तरीही सक्तीनं स्वयंपाक करावा लागत असेल. सहजीवनाचा एक भाग म्हणून स्वयपाक घराकडे पाहता येईल का? लगेच उठून सवय नसतानाही स्वयपाक करण्याऐवजी तांदूळ निवडण, भाजी निवडणं, चिरणं, ओटा स्वच्छ करणं, भांडी घासणं, अशा कामात पुरुषांना हातभार लावता येईल का? एक काळ असा होता की स्वयपाक घरातच बायकांची जागा होती. आता बायकांची जागा सर्व जगभर झालेली आहे. तेव्हा थोडी पुरुषांनीही आपली जागा स्वयंपाक घरही आहे असं मानायला काय हरकत आहे.

एकदा आमच्या एक शेजारीण बाई एवढी चटणी वाटून द्याल का म्हणून विचारत्या झाल्या. मी म्हटलं मिक्सर आहे ना तुमच्याकडे ? त्या म्हणाल्या, यांच्या शिवाय त्याला कोणी हात लावत नाही. उगीच बिघडला तर काय घ्या. मी बायकोला म्हटल देतेस का त्यांना मिक्सरवर चटणी वाटून तर त्या नको उगीच तुमचा मिक्सर बायकोनं बिघडवला तर माझ्यावर नाव यायचं म्हणून निघूनच गेल्या.

आपण बायका म्हणजे निरुपयोगी, ऐतखाऊ, अडाणी असा संस्कारच जन्मभर झालेल्या त्या बाईंच मला अतिशय वाईट वाटले. म्हणजे माझी बायको शिकलेली आहे तिला मिक्सर चालवता येऊ शकतो यावरही त्यांचा विश्वास नव्हता. आपला जोडीदार असा आहे का ? आणि आत्मविश्वासाच्या अभावी झालेल्या चुकीचा उद्धार ''बायकांच्या अकला चुलीत'' असा आपण रागाच्या भरात तर करीत नाही ना. पुरुष म्हणून झालेल्या काही छापील संस्कारात मी सुद्धा वाढलो आहे याची जाणीव मला बायकोन करून दिली. मग माझं बायकोला उगाचं सूचना देणं, मी प्रयत्नपूर्वक कमी केलं. हा ही एक पाठ स्वतः शिकायला लागतो. शिकलेली बायको शोभेची नसावी. तिच्या शिक्षणाचा उपयोग व्हायला हवा. शिक्षण ही एक राष्ट्रीय संपत्ती आहे तिचा अपव्यय होऊ नये. ओळखीच्या एका डॉक्टरीण बाईंना त्यांच्या नवऱ्याने उरलेल्या वेळात दवाखाना चालवायची परवानगी दिली. दवाखाना दुपारी १२ ती २ फक्त. मूल झाल्यावर त्यांनी दवाखाना बंदच करून टाकला. मुलाला कोण बघणार ? हे शोषण नाही असं काही स्त्रियांनाही वाटतं हे मोठं दुर्दैव आहे !

आपली बायको आपल्या सारखीच माणूस आहे. त्यामुळे तिच्या हातून चुका होणार आणि त्या करण्यासाठी आणि सुधारण्यासाठी संधी आपणच निर्माण करायला हवी. ही संधी आपणही घ्यायला हवी. पुरुषी अहंकाराचं कवच हळू हळू वितळत गेलं तरच माणूस म्हणून वाढायला जागा निर्माण होऊ शकेल.

नवऱ्याचा मार, त्याने केलेला अपमान सहन करूनही बाईन राहिलं पाहिजे. हा संस्कार आजही चालूच आहे. मला तरी वाटतं त्यासाठी आधी बायकांनी कणखर व्हायला हवं. जेव्हा बायका योग्य वेळी आपल्या नवऱ्याच्या कानफडात मारायला शिकतील तेव्हा ५०%

---

जीवनात कोणते कार्य करायचे ते शोधा आणि ते करण्यासाठी कटिबध्द व्हा.

हिंसाचार कमी होईल. असं एक माझं धाडसी विधान आहे. बायको सहन करते म्हणून सोकावलेले पुरुष म्हणून आपण नसलं पाहिजे. बायकोच्या जिव्हारी लागण्याच्या जागा माहीत झाल्या म्हणून तिला त्रास देऊन आपल्याला सुख मिळत असेल तर स्वतःलाच तपासून पाहिलं पाहिजे. नवऱ्याला ज्या गोष्टीत अपमान वाटतो त्या गोष्टी सूड म्हणून, बदला म्हणून करणं म्हणजे पायाखालच्या फळीचे दोन तुकडे करणं आहे. बायकोला सोडून दिली म्हणून पुरुषांचं काही बिघडत नाही असं नाही. त्यामुळे चांगले गटांगळ्या खाणारे पुरुषही समाजात दिसतात. ते फक्त पुरुषी अहंकारानं या गोष्टी स्वीकारत नाहीत. एकमेकांचे मर्म माहीत होणं म्हणजे एकमेकांना दिलासा असणं आहे. आपल्या जोडीदाराला चुकून सुद्धा अपमान, अवहेलना होणार नाही या साठी जपलं पाहिजे. चुकून तसं झालं तर सपशेल माफी सुद्धा मागता आलीच पाहिजे. सहजीवनाचं नात हे कोमल फुलपाखरासारखं आहे. त्याला जरा सुद्धा धक्का लागता कामा नये.

सहन करणं हा आपल्या बायकोचा गुण आहे असं तिचं म्हणणं असेल तर ते प्रथम मोडून काढायला पाहिजे. सहन करणं म्हणजे शोषण करून घेणं. मुलांना आईचा धाक वाटत नाही. हे सुद्धा शोषण आहे. हे शोषण थांबवण्यात पुरुषांचा जास्त हात पाहिजे. अमूक गोष्टीतला अधिकार आईचा म्हणजे आईचा. ती जेवायला वाढणार नसेल तर आपण मुलाला बाहेर खायला घालून आणून आईची जिरवणं म्हणजे मुलाच्या त्रास देण्यावर पांघरूण घालणं आहे.

''थांब बाबांना सांगते तुझं नाव'' हे आईनं म्हणणं सुद्धा थांबवायलाच हवं. बायको म्हणून समाजाने तिच्या शिरावर दिलेल्या जबाबदाऱ्यांबाबत आपण सजग असायला पाहिजे. घर अस्वच्छ आहे म्हणून बायकोला नावे ठेवणाऱ्या नातेवाईकांना मी अस्वच्छ आहे हे सांगता यायला पाहिजे. सून म्हणून अवास्तव अपेक्षांच्या बाबतीत नवऱ्यानेच ठाम राहून बायकोला माणूसपणाचे हक्क मिळवून दिलेच पाहिजेत. पाहुणे, मित्रमंडळी यांचं करणं यासाठी बायकोच्या आवडी निवडींवर हमखास गदा येते. आपल्या मित्रांसाठी आपणही घरात पार्टीची तयारी बरोबरीने केली पाहिजे. अनेक दिवस ठरवून नाटकाला जायच्या वेळीच पाहुणे आले तर पाहुण्यांना घरात ठेवून आपण जावं नाटकाला आणि पाहुण्यांना त्यातली अपरिहार्यता समजून सांगावा.

स्त्रियांचं शोषण करविणारी आणखी एक संकल्पना म्हणजे बायकांना खायला फारसं लागत नाही. अनेक स्त्रिया स्वतःच याचं कोडकौतुक करताना दिसतात. त्याचा त्यांना मोठा अभिमान वाटतो. घरकामाच्या आणि बाहेरच्या कामाच्यासाठी खर्च होणाऱ्या कॅलरीजचा हिशेब बायका काही करीत नाहीत. पुरुषांच्या मते ही गोष्टच महत्त्वाची नसते. स्वैपाक केलाय म्हणजे तिचाही असणारच ना केलेला?. एकूण स्वैपाकाकडे पाहून आपलं जेवण ठरवायचं हा संस्कार पुरुषमंडळीकडून नसणं मी माझ्या घरीच अनुभवलं होते. मला तोंडीलावणं (म्हणजे दुय्यम बरं) नसलं तरी चालतं याचा अभिमान असणाऱ्या आणि स्वैपाकाच्या कष्टाचे डोंगर उपसणाऱ्या बायकांकडे पाहिलं म्हणजे माणूस म्हणून मला जे वाटलं ते मला शब्दात मांडता येत नाही. पूर्वी आपण काम करत नाही ( म्हणजे नोकरी) म्हणून ऐतखाउ म्हणून बायकांना पोटभर जेवणाचा हक्क नाही हे बायका मानत. आता मिळवत्या स्त्रियांच्या कुटुंबामध्ये असा संस्कार कमी झाला असेल तरी सर्व प्रकारच्या सुविधा, सोयी, आणि गरजा भागवण्याच्या बाबतीत बायकांचं दुय्यम स्थान आजही सर्वार्थाने कमी झालेलं नाही. इथे मूल म्हणून नवरा, दीर, सासरा, सासू, म्हणून आपल्या भूमिकेतून घरातल्या स्त्री विषयी विचार करताना ही गोष्ट आपण नजरे आड करून चालणार नाही.

स्त्रियांचं शोषण करविणारी आणखी एक कल्पना त्यांच्यामधे घट्ट रुजवली गेली आहे ती म्हणजे बायका दुर्बळ असतात. नवरा हा देव. म्हणजे संपलंच. पण मी अबला आहे म्हणजे मला तर शक्ती नाहीच आणि मी माझी शक्ती वाढवूही शकत नाही. या संकल्पनेमुळे अगदी शेळपट पुरुषांचं ही फावतं. शिवाय संसार मोडण्याचं पाप माथी मारणारा समाज काही नवऱ्याच्या मारा पासून वाचवायला येत नाही. म्हणजे बाईने कसं जगायचं हे ठरवण्याचा बाईचा अधिकार तिला कसा आणि कधी मिळणार याचा विचार समाज म्हणून आपण करायला हवा. नवऱ्यांचे कामाचे ताण, उद्वीग्नता, निराशा याचं प्रक्षेपण बायकोवर करणं कितपत न्याय्य आहे. अशा बायकोच्या ताणांचं आणि निराशांचा परिणाम होऊन नवऱ्याचा छळ झाला किंवा त्याला त्रास झाला असं आपण सहसा ऐकत नाही. मग येथे लक्षात येतं की समानतेची लढाई किती कठीण आहे.

### जीवन ध्येय

महान जीवनध्येयाने प्रेरित झालेली जोडपी आपण जगभरात सर्वत्र पाहिली आहेत. महात्मा फुले, अण्णासाहेब कर्वे, महात्मा गांधी यांच्या बायका त्यांच्या कामात अटीतटीने उभ्या राहिल्या आणि त्यांनी सहचरी हे नाव सार्थ केलं. अगदी सावित्रीबाई, आनंदीबाई आणि कस्तुरबांनी शपथपत्रावर लिहून दिलं की आम्ही राजी खुशीने आमच्या नवऱ्याच्या कामामधे काम केलं. तरी मला नेहमीच वाटत राहतं की अर्धांगी पणाचा संस्कार यांच्यावर नव्हता का ? तर होता. मग यांच्या नवऱ्यांनी यांना काही तुझं जीवनध्येय तू स्वतः शोधून काढ अशी मुभा दिली नव्हती.

बापूंनी स्वतःची आदर्शजीवनाची कल्पना आपल्या मुलांवर लादली, त्यांनी वाचलेली डेव्हिड थोरो, आणि टॉलस्टॉय आपल्या मुलांना वाचायला देऊन तुम्हाला यातलं काय पटतं ते पाळा असं सांगितलं नव्हतं. अर्थात प्रत्येक व्यक्तीची बलस्थानं असतात तशा मर्यादा असतात. पण म्हणून माझ्या मते तरी जीवन ध्येयाचा विचार दुय्यम ठरत नाही. जगायचं कशासाठी बुवा ? काही अडलय का जगण्यावाचून तसं काय नडलयं का लग्न करण्यावाचून असा प्रश्न आपल्याला पडायला हवा आणि नडतय हो लग्नावाचून (शरीरसंबंधावाचून नाही ) असं उत्तर असेल तर नक्की लग्न चांगल्या प्रकारे पाळू आपण. स्त्री आणि पुरुष एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत असं तात्त्विक वाक्य फेकणारे लोक याचा अर्थ सांगताना बिचकलेले मी पाहिलेत. नुसतं स्त्री आणि पुरुष म्हणून नव्हे तर एक चांगली सामाजिक व्यक्ती म्हणून घडण्यासाठी उभय लिंगीयांची गरज आहेच.

नवरा बायकोंमधे तात्विक मतभेद ही गोष्टच अनेकांना नवीन वाटते. (मतभेद नसतील तर ते कसले नवराबायको?) म्हणजे बहुतेक वेळा नवऱ्याचं मत तेच बायकोचं मत. अथवा बायकोला मतच नाही. किंवा बायकोचं डोकं जरा शार्प असलं तर आपली हार खिलाडूपणे मान्य करण्याऐवजी विषयच बंद करायचा हे काही निरोगीपणाचं लक्षण नाही.

(माझी बायको माझ्यापेक्षा जास्त शिकलेली असल्यामुळे आपल्याला तिच्यापेक्षा कमी कळतं हे पूर्वी मला कधी कधी त्रासाचं वाटायचं. आता नाही वाटत.)

बहुधा यामुळेच जीवनध्येय वगैरे ठरवण्याच्या फंदात बायका पडत नाहीत, नसाव्यात. कारण एखाद्या कामात झोकून द्यायचं ठरवलं तर घराकडे कोण पहाणार किंवा मुलांचं कसं हे प्रश्न बाईलाच पडतात. पुरुषांना नाही. जीवनध्येयाची आखणी करतात याची वाटणी व्हायला पाहिजे. समाजात ज्या प्रमाणात स्त्रियांचं नेतृत्व विकसित होईल त्या प्रमाणामधे स्त्रियांची ही गरज निर्माण होईल तेथे त्यांच्या पायातली संसाराची बेडी नवऱ्यानेच काढून टाकायला हवी. नाहीतर कोण तिला भरारी घेऊ देणार. नवऱ्याचं अमूक ध्येय आहे म्हणून आपण शरणागत व्हायचं

हे सुद्धा हमखास ठरलेलं. बहुतेक सर्व राजकीय पुढाऱ्यांच्या बायका हे याचं एक उदाहरण. जीवनध्येय ठरवणं हा बायकांचाही समान हक्क नाही का? आणि त्याकरता पुरुषांनी कधी तरी त्याग करायला नको ?

**पुरुषांच शोषण होतं की काय**

शोषण म्हणजे काही अनुभवांपासून पुरुष वंचित राहतात. आणि त्यांची माणूस म्हणून समान कौटुंबिक जबाबदारी निभविणारी व्यक्ती म्हणून वाढच होत नाही.

रविवारी सकाळी ब्रेकफास्टला टोमॅटो सूप नऊ वाजता टेबलावर हजर करणारी गृहिणी सकाळी सात पासून त्यासाठी खपत असेल तर तिलाच का बरे हे कष्ट करायला लागावेत ? जोडीदार म्हणून रविवार सकाळच्या न्याहरीची तयारी करण्यासाठी नवऱ्यानेही जबाबदारी घ्यायला हवी. स्वयपाक घरात काम करायला लागल्यापासून मला स्वतःला हे स्वयपाक करण म्हणजे शोषण नाही असं वाटायला लागलं. पण माझीही त्यातली आवड कमी झाली नाही.

स्वयपाक करणाऱ्या पुरुषांविषयी बायकांच मत म्हणजे तुमच्या स्वयंपाकाचा पसारा आवरण्यापेक्षा मला स्वयपाक करणं परवडत किंवा तुम्ही कधी करणार आणि जेवणार कधी ? आता बायकांना संस्कारांपोटी आणि सरावाने स्वयपाकाचा उरक आलेला असेल म्हणून स्वयपाक करणाऱ्या पुरुषाला (इथे मी नवऱ्याला नाही म्हणत कारण यात मुलगा, दीर, सासरे हे सुद्धा मोडतात.) बायकांएवढ स्वयपाकाचे सार्वभौम कौशल्य आत्मसात झालं नसेल. पण ते सुद्धा त्यांना सरावानंच येणार आहे ना? अर्थात स्वैपाक करणाऱ्या पुरुषांनी वेळ, श्रम, नंतरचं आवरणं आणि काम जास्तीच वाढवून ठेवणं हे मुद्दे सुद्धा नजरेआड करता कामा नयेत. मग भेटीला येणाऱ्या मित्रांना या गोष्टींची सवय झाली म्हणजे ते सुद्धा आपल्या घरी चहा करून बघतील आणि बायकोला चकित करतील. किंवा स्वैपाक घरात गप्पा मारत बसतील. कपडे धुण, स्वतःच्या वस्तू स्वतःच्या जबाबदारीने जपून ठेवणं, यांची सवय बायकांनी लावलीच पाहिजे पुरुषांना. मुलगा सातवी/आठवीत गेला की स्वतःचे कपडे स्वतः धुण्याची सवय लावलीच पाहिजे. मुली स्वतःचे कपडे स्वतः धुतात. किमान आपलं अंतर्वस्त्रतरी आपणच धुवायला पाहिजेत. आपला चहाचा कप आपण उचलणं. आपल्याला घालायच्या कपड्यांची (बटणांची बकलांची) काळजी घेण. ह्या सवयी लावायला हव्यात. युरोपियनांचा हा संस्कार मात्र आपण नजरेआड केला आहे. अर्थात तिथे सुद्धा दुसऱ्याप्रकारचे नवरे असतीलच. पण जेवणानंतर भांडी घासणाऱ्या पुरुषांची टक्केवारी तरी जास्ती असलेच ना?

विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आता नवराबायको दोघंच, मग मूल होणार आहे वगैरे त्यांनाच पहावं लागणार असतं. पण अजूनही बहुतेक ठिकाणी पाहिलं बाळंतपण माहेरी होणार असेल तर अनेक अनुभवांना पुरुष वंचित होतात. याची जाणीव पुरुष म्हणून आणि बाई म्हणून आपल्याला व्हायला हवी. गर्भारपणाची सुरुवात, तेव्हा होणारा त्रास, तेव्हा नवऱ्याची लागणारी गरज या गोष्टींमधून बाळाबद्दलच्या बाप म्हणूनच्या भावना घडत असतात. गर्भारपणात काय त्रास होतात याचा अनुभव जोडीदार म्हणून नवऱ्याला समजायाल हवा म्हणजे अॅट व्हॉट कॉस्ट, काय किंमत मोजून आपल्याला समजायला हवं याचा भावनिक वाटा नवऱ्याला उचलता आला पाहिजे. बाळाला जन्म देण्याची क्रिया कशी कष्टप्रद आहे हे आता काही ठिकाणी तरी बापाला प्रत्यक्ष पाहता येते. तो अनुभव तर होतकरु बापाने घ्यायला पाहिजे. म्हणजे आपली नवरा म्हणून आणि बाप म्हणूनची भूमिका यांच्या पायासाठीची जमिन चांगली तयार होते. जन्मलेल्या बाळाचा स्पर्श, त्याच्याकडे त्याच्या त्रासांकडे पाहिलं म्हणजे माणूस पुष्कळ घडतो असं मला

तरी वाटतं. माणूस म्हणून घडण्यासाठी याचा अनुभव मिळायलाच पाहिजे पुरुषांना.

नवजात बाळाचं या जगाशी जुळवून घेताना रडणं, रात्री जागवणं, आजारपणात जीवाची होणारी घालमेल यात पुरुषांचा वाटा असायलाच हवा. बाप होण्याची तावडतोब किंमत चुकवली म्हणजे बाप पणाचं मोल कळायला लागते. मग देवाघरचं देणं वगैरे चुकून सुद्धा तोंडून बाहेर पडायचं नाही.

घर चागलं राखणं हे सुद्धा पुरुषांच्या परिघातलं काम नाही असं अनेकजणी मानतात. तिथे सुद्धा पुरुषांनी आपल्या व्यवस्थापकीय कौशल्यांचा उपयोग करायला पाहिजे. घर आवरण्याची जबाबदारी बायकोची पण आपण मात्र हातच लावायचा नाही हे चालणार नाही याचा ठामपणा बायकांनी दाखवलाच पाहिजे. आणि पुरुषांनी समजून घेतला पाहिजे.

माणूस म्हणून, समाजातील एक जबाबदार विकसित व्यक्ती म्हणून घडताना जर असे अनुभव पुरुषांना मिळालेले असतील तर त्यांचा माणूस म्हणूनही दृष्टिकोन अधिक पारदर्शी होईल. मग ते रात्री बेरात्री एखाद्या मित्राकडे अचानक जेवायला जायचं टाळतील. किंवा कौटुंबिक उपयोगाच्या वस्तूंची निवड अधिक चोखंदळपणाने करायला लागतील.

**सहजीवन - एक धडा धडपडता**

आज हे सगळं लिहिताना मी काही फॅमिली लाईफ एक्स्पर्ट म्हणून लिहित नाही. यातले बरेच धडपडते धडे शिकणारा एक साधा विद्यार्थी म्हणून माझा अनुभव सगळ्यांना सांगावासा वाटला म्हणून लिहितोय.

माझा जन्म एका साध्या मध्यमवर्गीय पुरुषप्रधान घरातच झाला. त्यामुळे माझ्या घरातलं माझ्या आईचं आणि इतर बायकांच शोषण मी पाहिल आहे. क्वचित त्यात जाणते, अजाणतेपणी मी भाग घेतला आहे. स्वतःवरच्या पुरुषप्रधान संस्कारांची जाणीव, स्वतःच स्वैपाकघरापासून सगळं घर सांभाळण्याचा अनुभव (आई आणि वहिणीच्या पश्चात) आणि आपण शोषण करणारे नसायला हवं अशी भूमिका यातून माझा स्वतःचाच लग्नाचा विचार पुष्कळ वर्षे लांबणीवर पडला होता. आता लग्न झाल्यावर मी एक आदर्श नवरा वगैरे झालो असे नाही.

याचं महत्त्वाचं म्हणजे पुरुष म्हणून माझ्या अहंकाराची मलाही नीट न लावता आलेली व्यवस्था. आज तरीही मी म्हणतो की माझं वैवाहिक आणि कौटुंबिक जीवन सुखी करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. त्यात मला यश येईल असं आजही वाटतं कारण माझी जोडीदार ही अशा प्रकारच्या (म्हणजे जरा विचार, कृती करणाऱ्या) संसाराची भागीदार म्हणून जोडीने वाटचाल करते आहे.

सहजीवन नावाचं पुस्तक जगात उपलब्ध नाही. ते प्रत्येक जोडप्याला मिळून लिहावं लागतं. त्याची एक छापील संहिता तयार नाही मिळत, कारण ती परिस्थिती आणि स्वभाव यांच्या नुसार वारंवार लिहून जगावी लागते. खोडावी लागते, पुन्हा लिहावी लागते. पुरुष म्हणून माझ्या अहंकाराला धक्का देणाऱ्या अनेक गोष्टी मला पचवता आल्या, कारण माणूस पणा नावाचा शॉक अॅबसॉर्बर माझ्यात मी जिवंत ठेवला होता.

ही धडपड आहे. त्यात माणूस तोंडावर आपटतो जखमा होतात, जिव्हारी लागतं. आता काही बोलताच येणार नाही कधी आपल्याला असं वाटतं. आणि मग लग्न झालेले पुरुष बिना लग्नाच्या पुरुषांना सुखी म्हणतात. इथेच एक गोष्ट असते की आपल्या सारख्याच मन, बुद्धी, आणि अहंकार असणाऱ्या दुसऱ्या माणसाबरोबर जर जगावचं आहे तर थोडी काटछाट करायला लागणार आपल्यालाही. मग काही गोष्टींचे परिणाम तपासले पाहिजेत आणि काही गोष्टींकडे दुर्लक्षच करावं लागेल. जर सहजीवन घडवायचं असेल तर.

अहंकार म्हणजे तर आत्मप्रतिमा. पूर्वी आपला एकच फोटो असायचा. सहजीवनात जर का पासपोर्ट साईजमध्ये बसायचं असेल दोघांना तर दोघेही दिसणार नाहीत ना पूर्ण. उदाहरणार्थ लग्नापूर्वीच्या सवयी, तेव्हाच्या आवडी, तेव्हाचा दिनक्रम मोडायलाच लागणार आणि पराभिमुख, किंवा संसारभिमुख नवा क्रम जुळवावा लागणार. ही स्वतःच्या सवयींशी, जगण्याशी करावी लागणारी तडजोड एका जोडीदाराने करायची नाकारली म्हणजे सहजीवन निर्माण होत नाही. मग निर्माण होतं एका जोडीदाराचं शोषण आणि दुसऱ्यांच सुखी आयुष्य. दोघांच जगणं सुखी करायला दोघांनाही जरा कष्ट पडणार, आणि आपल्याला पाहिजे ते लगेचच मिळेलच असं नाही याची तयारी ठेवायला लागणार.

या अर्थाने मी सुद्धा अजूनही, शिकतो आहे तो, सहजीवन नावाचा धडपडता धडा. माझ्या या धडपडीत मला माझी जोडीदार आणि तिला मी आहोत. जो पर्यंत हात द्यायला, मदत करायला, तो पर्यंत तरी मी या सहजीवनात नक्कीच सुखी आहे. असं मी ठाम विश्वासाने म्हणू शकतो.

**श्री. प्रवीण दामले**
१२ अे, सोमनाथ अपार्टमेंट,
वीर सावरकर मार्ग, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१.

• • •

*With Best Compliments From*

**TRANS ERECTORS PVT. LTD.**

ENGINEERS & CONTRACTORS

**BOMBAY OFFICE :**
406, Punit Chambers,
Plot No. C-796, Sec - 18,
Vashi, Navi Mumbai - 400 703.
Tel : (022) 7613051, 7614322, Fax : 7613438
E-mail : transere@bom5.vsnl.net.in
**REGD. OFFICE :**
17, "Umed Bhavan", 2nd floor,
Station Road Pimpri, Pune - 411 018.
Tel. : (020) 7476517, 7477194 Fax : 7471943
E-mail : transere@pn3.vsnl.net.in
**WORK SHOP :**
GAT NO. 252,
JYOTIBA NAGAR, TALWADE, PUNE-412114.
Tel : (020) 7488702, 7488 737

**A FAST EXPANDING AND COMPETENT CONTRACTORS FOR :**
☆ Fabrication & Installation of C.S., S.S. IBR, L.T.C.S. Jacketed Piping.
☆ Fabrication & Erection of Structurals, Tank & Vessels.
☆ Erection of Mechanical Equipment
**UNDERTAKING PROJECTS ALL OVER INDIA**

*With Best Compliments From*

SELRACK

**SELRACK ELECTRONICS ENCLOSURES PVT. LTD.**

17-C, Electronic Sadan-1, MIDC, T.T.C. Electronic Zone,
Mahape, Navi Mumbai-400 701.
Tel. : 022-7688833

*With Best Compliments From*

**Dattakrupa Investment Consultancy**
**Vinay V. Tirodkar,** (Authorised Brokers & Consultants)
**L.I.C., U.T.I., N.S.C., P.P.F., H.D.F.C., G.I.C.,**
**Bonds, Company F.D.**
Office : A-102, Danyandev Soc.,
Near S.K. Patil School, Ramnagar, Dombivli (E)

Resi. : B-9, Suresh Shrushti,
Rajaji Path, Lane No 3
Shripal Nagar, Near Parkar School, Dombivli (E)

आयुष्य हे गुलाबाच्या काट्याप्रमाणे आहे.

# जरा विचार करा

सौ. मंजिरी दांडेकर

*( मुलांमधून माणूस घडवायचा असेल तर मुलांना जाणून घेतलं पाहिजे. त्यांच्याशी मैत्री केली पाहिजे. आपण मुलाचे मालक नसतो याचा जरा विचार करा - संपादक)*

नुकतेच १०वी, १२वी चे निकाल घोषित झाले. बऱ्याच विद्यार्थ्यांना अपेक्षेप्रमाणे गुण मिळाले. हव्या त्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला. पण काही विद्यार्थी असेही आहेत की त्यांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे गुण मिळाले पण त्यांच्या मतानुसार पुढचे शिक्षण घेण्यासाठी प्रवेश मिळाला नाही. अशातल्या काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या करून मृत्यूला कवटाळले तर काही जणांनी त्यांच्या मनाविरूद्ध वेगळ्या शाखेत प्रवेश घेऊन पुढचे शिक्षण सुरू ठेवले. या विषयावर चर्चा करता करता सहज विद्यार्थ्यांना महिला पोलिस ऑफिसर किरण बेदी यांच्या "आय डेअर" या चरित्रातील काही प्रसंग व सुप्रसिद्ध गायक श्री. अरुण दाते यांच्या 'शतदा प्रेम करावे' या पुस्तकातील काही प्रसंग सांगितले. ते थोडक्यात असे-

किरण बेदी यांना त्यांच्या करिअर निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य त्यांच्या पालकांनी दिले. त्याचबरोबर त्यांनी आपल्या मुलीला चांगल्या शिक्षणाची, खेळांची आणि इतर उपक्रमांची संधी दिली. त्यांना आपल्या इच्छेनुसार आयुष्य घडवता यावे म्हणून सवलतीही दिल्या. ही मुले मोठी होणार आहेत, स्वतःचे करिअर स्वतः घडविणार आहेत असाच किरण बेदींच्या पालकांचा दृष्टिकोन होता. घरात पुरुष प्रधान संस्कृती असूनही त्यांच्या पालकांनी हा निर्णय धाडसाने घेतला. मुलींना सर्वतोपरी मदत आणि सहकार्य करून त्यांचा उत्तम विकास घडवला. हे झाले किरण बेदी संदर्भात.

अरुण दाते यांच्या जीवनातील प्रसंग पहा. इंजिनिअरींगच्या दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यामुळे ते घरी आले ते 'हे आपल्याला जमणार नाही' असे धरूनच. त्यावेळेस ते गाणेही शिकत होते. गाण्यामुळे आपल्या अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले तेव्हा गाणे तरी सोडू किंवा शिक्षण सोडू असे ठरवून ते घरी आले. पण घरी आल्यावर वेगळाच प्रकार घडला. अनुत्तीर्ण झाल्याबद्दल वडील रागावले नाहीतच तर उलट ते म्हणाले, 'अरु, तुझ्या वर्गातील २० जणांपैकी १९ जण पास झाले. तू नापास झालास. पण जे पास झाले त्यांच्यापैकी कोणा कोणाला तुझ्यासारखी गझल म्हणता येते का?' त्यावर अरुण दाते म्हणाले, ' त्यांना 'आ' सुद्धा करता येत नाही.' वडील म्हणाले, ' हे बघ, हे इंजिनिअर वगैरे सगळे ऑफिसमध्ये, केबिनमध्ये असेपर्यंत, निवृत्त होईपर्यंतच. मग सगळे विसरतात. पण गायक म्हणून , कलाकार म्हणून तू सदैव लोकांच्या स्मरणात राहशील. तेव्हा गाणं सोडू नको, शिक्षणही सोडू नको ' असे म्हणून त्यांनी 'अरु तू काल छान गझल गायलास' त्याबद्दल मिठाई आणून वाटली.

हे सारे सांगितल्यावर विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया अगदी फिल्मी स्टाईल उमटली 'काश हमारे माँ बाप इनके माँ बापकी तरह होते' मग तोच धागा पकडून आमच्या गप्पा सुरु झाल्या. हो गप्पांतून चर्चा. सुरुवातीला दबकत बोलणारी मुले हळूहळू मोकळी झाली आणि बोलू लागली.

बाई, आम्हाला नैतिक शिक्षण देण्यापेक्षा आमच्या पालकांनाच द्या. अहो, हावरटपणा हा माणसाचा स्वभाव. ५ मिळाले की ५० कसे होतील मग ५० चे ५०० आणि मग ५००० कसे होतील याचाच विचार आमच्या बाबतीत मात्र मार्क्सवादी (Mark - गुण) एखाद्या परीक्षेत ८०% मार्क मिळाले तर 'एवढेच का?' असे विचारतील. तसेच एखाद्या विषयात १०० पैकी ९४ मिळाले तर उरलेले ६ गुण तू पुढच्या वेळस नक्की मिळवशीलच असा विश्वास न देता

'तुला एवढी पुस्तके दिली. गाईड दिली. क्लासला घातले तरी एवढेच मिळवता आले. असा राग येतो बाई. वाघ म्हटला तरी खातो. वाघोबा म्हटल तरी खातो. असं वाटत सोडून द्यावा अभ्यास आणि शाळा. आम्ही काय रेसचे घोडे आहोत का ?

हे सर्व ऐकल्यावर पालकांना अशी विनंती करावीशी वाटते की केवळ मुलांच्या अभ्यासातल्या हुशारीवरून त्यांची हुशारी ठरवू नका. त्यांची दुसऱ्या मुलांशी तुलना करून कमी लेखू नका. तर त्याच्यात अमूक एक गोष्ट नाही ती तुझ्यापाशी आहे याची जाणीव करून द्या. आपल्या मुलातील सुप्त गुण शोधून त्यांना वाव द्या. आपण राहतो ते घर नाही तर जिथे आपल्याला समजून घेतलं जात ते आपलं घर. तेव्हा मुलांना समजून घ्या. स्वतःच्या अवास्तव अपेक्षा, महत्त्वाकांक्षा त्यांच्यावर लादू नका. आज शिक्षणाची अनेक क्षेत्रे खुली आहेत त्याची त्यांना माहिती करुन द्या व त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांना अभ्यासक्रम निवडू द्या.

मुलांना हवे आहे तुमचे प्रेम, तुमचा आश्वासक हात. आपल्यामागे कुणीतरी उभे आहे याची त्यांना जाणीव द्या. थोडे प्रोत्साहन दिलेत तरी बघा मुलांच्यात किती फरक पडतो ते. मी एक कलाशिक्षिका. आजपर्यंतचा अनुभव असा की, घरी चित्र रंगवायला दिले की पालक ते करू देत नाहीत. शाळेतला वेळ पुरेसा नसतो. मग मुलांनी करावे काय? माझा एक अनुभव येथे नमूद करावासा वाटतो - एका मुलाला अभ्यास करताना एखादी कल्पना सुचत असे व ती कागदावर उतरवायला त्याचे हात शिवशिवत. पण लगेच वटारलेले दोन डोळे दिसत आणि ती कल्पना मनातच घर करून बसे. एकदा असाच तो चित्र काढत असताना त्याचे वडील तेथे आले. त्याला चित्र काढताना पाहून त्यांच्या रागाचा पारा चढला. त्यांनी त्याचे सामान तर उचललेच पण काढलेले चित्रही फाडले. दुसऱ्या दिवशी त्या मुलाने ही घटना मला सांगितली व म्हणाला,' बाई, एकदा कल्पना सुचली की ती कागदावर उतरवल्याशिवाय चैन पडत नाही. अभ्यासातही लक्ष लागत नाही. पण चित्र काढून झाल्यावर अर्धा तास जरी अभ्यास केला तरी पुरतो.'

हे ऐकल्यावर त्याच्या पालकांना भेटले. त्यांना विनंती केली की, सहामाही परीक्षा होईपर्यंत त्याच्या कलाने, चित्रे काढून मग अभ्यास करू दे, मार्क कमी मिळाले तर मी त्याला समजावीन. कारण ते वर्ष दहावीचे होते. दहावी व बारावीच्या परीक्षेला आपल्याकडे अवास्तव महत्त्व दिले जाते. खरे तर त्याच्यापुढच्या परीक्षा महत्वाच्या असतात. असो. माझ्या विनंतीला त्या पालकांनी नाखुषीनेच होकार दिला. हे मी त्या मुलाला सांगताच त्याचा चेहरा खुलला. आजही तो समाधानी, हसरा चेहरा आठवतो. तर, सहामाही परीक्षेत तर त्याने चांगले मार्क मिळवलेच पण बोर्डाच्या परीक्षेत उत्तम गुण संपादन करुन त्याने शास्त्र शाखेत प्रवेश घेतला. महाविद्यालयात असताना कुठेही पेंटिंगची स्पर्धा असली की तो वर्गाचे तर कधी कॉलेजचे प्रतिनिधित्व करीत असे. त्याच्या जर्नलमधील आकृत्या वर्गात आवर्जून दाखवल्या जात.

तेव्हा मुलाना समजून घ्या. आपले मित्र माना. परीक्षा चालू असताना आपण टी.व्ही. पहायचा आणि मुलांना सांगायचे तुम्ही अभ्यास करा. आपणच मोह टाळला पाहिजे. मुले अभ्यास करताना त्यांच्याजवळ बसा. त्याच्या अभ्यासातले मला काही कळत नाही असे म्हणू नका. अहो, अभ्यास करताना त्यांच्याजवळ बसलात तर तुमचा एवढासा सहवासही त्यांना अभ्यास करायला प्रवृत्त करेल.

मी कोणी तज्ज्ञ नव्हे. पण एक शिक्षक म्हणून आलेले अनुभव व आपल्याला काय करता येईल एवढेच सांगितले. तरी मुलांकडे लक्ष द्या. एवढीच विनंती.

**सौ. मंजिरी दांडेकर**
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.)

• • •

---

आयुष्य हा क्षणाक्षणाचा संचय आहे.

# जमाना ई-कॉमर्सचा

श्री. मुंजे

*(ई-कॉमर्स इतक्या वेगाने वाढत आहे की आणखी काही वर्षात अर्थशास्त्राचे रूपच बदलणार आहे. जाणकारांच्या मते ही अर्थ क्रांती आता फार दूर नाही. या ई-कॉमर्सबद्दलचा कल्पना देणारा हा लेख आहे. - संपादक)*

स्पर्धा ही आज प्रत्येक क्षेत्रातील अविभाज्य घटक बनली आणि त्यातही बाजार क्षेत्र असेल(Marketing) तर ही स्पर्धा फारच रंगते. पूर्वी गरज ही शोधाची जननी आहे असे म्हटले जायचे. परंतु या क्षेत्रात तरी स्पर्धा हीच शोधाची जननी असते असे म्हटले तरी चालेल. आज असे दिसते की या क्षेत्रातील प्रत्येक जण स्वत:ला बाजार विश्वातील स्पर्धेचा विजेता म्हणून घोषित करण्यासाठी सज्ज आहे.

२१व्या शतकाला सामोरे जाण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्सच्या सहाय्याने लावलेले अगदी नवे शोध म्हणजे E-Mail, E-Bzz, E-Comunication, E-Marketing, E-Gambling, E-Trading, E... एक ना दोन ! आणि खरेदी विक्री क्षेत्रातील फार मोठे परिवर्तन घडवून आणणारे असे E-Commerce. E-Commerce यातील E म्हणजे Electronics आणि यातील Commerce हा या शब्दाशी अगदी योग्य रितीने जुळून जातो.

खरं तर वाणिज्य क्षेत्र हे सर्व काही खरेदी विक्रीच्या व्यवहारांशी संबंधित असते. समोरा समोर सौदेबाजी होते आणि कागदोपत्री त्यांची नोंद ठेवली जाते.

E-Commerce साठी इंटरनेट सिस्टिम आवश्यक आहे. सैध्दांतिक दृष्ट्या इंटरनेट प्रत्येकाला त्याच्या P.C. द्वारे Mouse, Key Board, Software Programme च्या सहय्याने जोडून ठेवतो. आणि प्रत्येकाला चर्चा विचार विनिमय कागद पत्रांची देवाण घेवाण या सोयी दृक्श्राव्य व इतर संगणकीकृत माध्यमाच्या आधारे उपलब्ध करून देतो त्यामुळे अनेक गुंतागुंतीचे व्यापारी व्यवहार सहज शक्य होतात.

E-Commerce म्हणजे नक्की काय ? तर तुमच्या P.C. च्या आणि दूरध्वनीच्या सहाय्याने इंटरनेट मार्फत व्यापार करणे, थोडक्यात असे बाजारक्षेत्र की जेथे व्यापार व्यवहारासाठी इंटरनेट वा संगणकाचा वापर पुढील गोष्टींसाठी केला जातो.

१) व्यापारी प्रक्रियेसाठी

२) व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यासाठी

३) मालाची खरेदी विक्री करण्यासाठी सेवा आणि चौकशी पुरविण्यासाठी ( E-Mail तर्फे)

E-Commerce साधारण ४ प्रकारात विभागता येईल.

१) व्यवसाय/व्यापारी व ग्राहक यांच्याशी संबंधित

२) व्यवसाय/व्यापार इतर व्यापार यांच्याशी संबंधित

३) ग्राहक व व्यापार /व्यवसाय यांच्याशी संबंधित

४) ग्राहक व ग्राहक यांच्याशी संबंधित

**१. व्यवसाय/व्यापारी व ग्राहक यांच्याशी संबंधित -**

समजा तुम्हाला एक म्युझिक सिस्टीम खरेदी करायची आहे तर त्यासाठी तुम्ही स्वत: दहा दुकाने फिरण्याची आवश्यकता नाही तर तुम्ही त्यासाठी इंटरनेटचा

वापर करू शकता किंवा दुसऱ्या शब्दात तुम्ही तुमच्या P.C. द्वारे इंटरनेट सेवा तुमच्या घरी उपलब्ध करून घेऊन इंटरनेटवर उपलब्ध व्यापाऱ्यांशी संपर्क साधू शकता.

या साठी प्रथम तुम्हाला वेबसाईटच्या लायब्ररीमध्ये शोध घेतला पाहिजे की जी तुम्हाला भरपूर माहिती उपलब्ध करून देते. जसे, असे किती इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे विक्रेते आहेत की जे म्युझिक सिस्टीम विक्री करतात. या पैकी काहींची निवड केल्या नंतर तुम्हाला कोणत्या ब्रँडची सिस्टीम खरेदी करायची ते ठरवावे लागेल. यासाठी खूप मोठा माहितीचा साठा डेटाबेसवर उपलब्ध असतो ज्यामधे विविध कंपन्यांच्या उत्पादनांची माहिती चित्रांसह उपलब्ध असते. यामधून तुम्ही तुमच्या आवडीचे मॉडेल निवडायचे की ज्याची किंमत तुम्हाला योग्य वाटते, जी तुमच्या गरजा पूर्ण करू शकते. यानंतर ते तुम्ही तुमचे नाव पत्ता व क्रेडीट कार्ड नंबर टाईप करायचा की जो High Security Software द्वारे सुरक्षित ठेवला जातो. या नंतर तुम्ही buy च्या बटनावर क्लिक करायचे, की ज्यामुळे तुमच्या खरेदीच्या निर्णयाची निश्चिती होते.

तुमच्या या मागणीची नोंद कंपनी द्वारे घेतली जाते. आपण तिला E-Music म्हणू. तर या नंतर तुमच्या मागणीवर पुढील प्रक्रिया करून ती कारखान्याच्या कॉम्प्युटरवर व पुरवठा दारांकडे पाठविली जाते. क्रेडीट कार्डच्या कंपनीलाही किंमतीची रक्कम तुमच्या खात्यातून कंपनीच्या खात्यात जमा करण्याचे संदेश दिले जातात. दुसरा संदेश कंपनीच्या Finance Department ला दिला जातो की जेथे संबंधित बिल बनवून ते सिस्टीम सोबत पाठविले जाते. अशा तऱ्हेने काही दिवसातच तुम्ही एका नवीन म्युझिक सिस्टीमचा आनंद लुटु शकता आणि तेही एकाही दुकानाला भेट न देता.

### २) व्यापार व व्यापार परस्पर संबंधित

वरील उदाहरणातील E-Music कंपनी व पुरवठादार यांच्यातील इलेक्ट्रॉनिक देवाण घेवाणीचे व्यवहार या प्रकारात मोडतात.

### ३) ग्राहक व व्यवसाय यांच्याशी संबंधीत

www.priceline.com हे याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. ही वेबसाइट भावी प्रवाशांना अशी सेवा उपलब्ध करून देते की ते या वेबसाईटशी संपर्कसाधून कोणत्याही दोन शहरांमधील प्रवासाची योग्य किंमत ठरवू शकतो आणि जर एखादी विमान कंपनी खुशीने या अर्जित किंमतीला तिकीट देण्यास तयार झाली तर प्रवाशालाही ते खरेदी करणे भाग पडते.

### ४) ग्राहक व ग्राहक यांच्याशी संबंधित

हा शेवटचा प्रकार इंटरनेटवर कोणत्याही व्यापाऱ्याच्या मध्यस्थी शिवाय उपलब्ध असतो. तुम्ही Consumer Exchange वेबसाईटवर तुमचे खाते उघडायचे मग त्यामधून समजा तुम्हाला तुमची जुनी मारुती ८०० विकायची आहे. आणि दुसरा कोणी की ज्याला विकत घेण्यात रस आहे तर दोघे परस्परांमध्ये अशी किंमत ठरवू शकता की ज्याची तुम्ही कल्पनाही केली नसेल.

### जाणकार काय म्हणतात ?

जाणकारांच्या मते २००१ पर्यंत E-Commerce चे जागतिक मूल्य जवळ जवळ 300 bilion Doller (अब्ज) तर २००३ पर्यंत 600 bilion Doller इतके असेल म्हणजे आता हा भरपूर पैसा आणि २००३ साल फार दूर नाही.

I.D.C. ही आणखी एक संशोधन संस्था असे भविष्य वर्तविते की सध्याची 159 Million असलेली Online ग्राहकांची संख्या 510 Million पर्यंत जाणार आहे. त्याच्या ही पुढे जाऊन जाणकार म्हणतात की हे

बाजाराची (Market) रूप रेषाच पालटून टाकणार आहे.

**E-Commerce चे फायदे**

१) E-Commerce मुळे व्यवसायाची भौगोलिक बंधने तोडली जातील व विविध कंपन्यांच्या व्यवसायाच्या कृतीकक्षा भौगोलिक दृष्ट्या एकत्र जोडल्या जातील.

२) कमी खर्च

३) कमी कर्मचारी वर्ग

४) Real Estate ची बचत

५) कमी (Maintanance) घसारा खर्च

६) माहितीचा वेगाने येणारा स्रोत

७) जलद प्रतिक्रिया

८) अधिक कार्यक्षमता

९) कमी जोखीम

१०) कमी किंमत

**ग्राहकांना होणारा फायदा**

ग्राहक कोणताही सौदा चांगल्या प्रकारे व्हावा यासाठी जागरूक रहातील आणि व्यवहाराचे निर्णय घेताना नुकसान कमी कसे होईल यासाठी प्रयत्न करतील.

E-Commerce सारख्या पद्धतीमुळे ग्राहक इलेक्ट्रॉनिक जगाच्या जीवनपद्धतीला सरावतील कारण आता विविध प्रकारच्या कार्डसूची संख्या वाढत जाणार. बँकाही आता संगणक व इंटरनेटवर सेवा उपलब्ध करतात.

जर अशा पद्धतीचा प्रसार वेगाने वाढत गेला तर या पिढीतील मुले खरेदी साठी कधी बाहेर पडणार नाहीत व कदाचित चलनी नोटा देखील पाहू शकणार नाहीत.

**श्री. मुंजे**
वि.प्र. मंडळाचा व्यवस्थापन विभाग,
ठाणे ४०० ६०१.

• • •

हार्दिक शुभेच्छा !



**करमरकर बंधू**

पत्ता : कोकणी मालाचे व्यापारी
पुष्कराज सोसायटी, लोकमान्य आळी, ठाणे.
फोन : ५४३ ८१५७

**आमच्या येथे अलिबागचे कडवे वाल, पांढऱ्या कांद्यांच्या माळा, अलिबागची काटाळलेली चिंच, रत्नागिरीच्या योजक कंपनीची सर्व उत्पादने मिळतील.**

*With Best Compliments From*

**TANVI DECORATORS**

We sell as well as give on rent all type of sets for all function

**Office :** Ram Bhuvan, 1st floor, Rajaji Path, Near Suyog Dept. Stores, Dombivli(E).
**Tel. : 911-420909**
**Resi. :** Mr. Ashok Shenvi, A/10, A/10, Sneh Roopmilan Soc., P & T Colony, Gandhi Nagar, Dombivli(E).
**Mobile : 09820042796**

# जुलै २०००

सौ. विशाखा देशपांडे

''दिशा' तर्फे सर्व वाचकांचे नव्या शैक्षणिक वर्षात स्वागत ! नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात शालांत परीक्षेच्या निकालाने झाली असून, सर्व परिसरातून उत्साहाचे वातावरण पसरलेले आहे. दोन महिन्याच्या उन्हाळ्याच्या सुट्टी नंतर पुन्हा एकदा अभ्यासाची, खेळांची व इतर कार्यक्रमांची आखणी सुरू झाली आहे. या वर्षी आमच्या शाळा-कॉलेजच्या परिसरामध्ये जो आनंद ओसडून जात आहे, त्याचे विशेष कारण म्हणजे सौ. ए.के. जोशी शाळेचा नचिकेत सुरेश थोरात याचे १०वी च्या परीक्षेतील घवघवीत यश. नचिकेतचे हे यश, हे केवळ त्याच्या शाळेला किंवा संस्थेच्या इतर विभागांनाच अभिमानाचे नाही तर सर्व ठाणेकरांना ही गोष्ट अभिमानास्पद आहे. काही वर्षापूर्वी एस्.सी.सी. व १२वी च्या परीक्षांमधे पहिले किंवा गुणवत्ता यादीत येण्याची, काही ठराविक शाळा-कॉलेजची परंपरा होती. निकालांच्या तारखेपर्यंत लोक डोळे झाकून, त्या त्या शाळा-कॉलेजांची नावे घेत असत. परंतु मागील काही वर्षातील निकाल पहाता, ही परंपरा आता मोडून निघाली आहे. राज्यस्तरीय निकाल काय किंवा विभागीय निकाल काय, राज्यातील कोपऱ्या कोपऱ्यातून विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत क्रमांक पटकावला आहे. या वर्षीच्या निकाला मधे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी सर्व विभागांमधे मोठ्या प्रमाणात यश मिळवले असून त्या मधे मुलींचे जास्त कौतुक करण्यासारखे आहे. देशातील 'सर्वात स्वच्छ शहर' हा पुरस्कार मिळाल्या नंतर व साहित्य आणि संस्कृती, कला व क्रीडा या सर्व क्षेत्रात पुढे असताना व सध्या सर्वांचा चर्चेचा विषय असलेल्या ठाणे शहराच्या शिरपेचात, शैक्षणिक क्षेत्रात, नचिकेत थोरात याने आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

नचिकेत थोरातचे हार्दिक अभिनंदन करून व त्याला पुढील आयुष्यात सुयश चिंतून ही परिसर वार्ता सादर करीत आहे.

**सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडीयम हायस्कूल**

इयत्ता १०वी चा निकाल १००% लागला असून निकालाचा तपशील असा-

| | |
|---|---|
| एकूण परीक्षार्थी | १३६ |
| उत्तीर्ण | १३६ |
| निकालाची टक्केवारी | १००% |

<u>नचिकेत सुरेश थोरात शालांत परीक्षेत ९३.३३% गुण मिळवून मुंबई विभागात सर्वप्रथम आला.</u>



कु. नचिकेत सुरेश थोरात

| | |
|---|---|
| विशेष योग्यता श्रेणी | ६० विद्यार्थी |
| प्रथम श्रेणी | ५७ विद्यार्थी |
| द्वितीय श्रेणी | १९ विद्यार्थी |
| उत्तीर्ण श्रेणी | -- |

शाळेमधे प्रथम १० क्रमांकावर पुढील विद्यार्थी :-

| | | |
|---|---|---|
| १) | नचिकेत थोरात | ९२.३३% |
| २) | अमृता गुप्ते | ८९.४६% |
| २) | सुप्रिया मराठे | ८९.४६% |
| ३) | हिमांशु देशपांडे | ८९.३३% |
| ४) | पराग शाह | ८९.०६% |
| ५) | महेश शाह | ८८.८०% |
| ६) | दिनेश अय्यर | ८८.६६% |
| ७) | तेजश्री गुप्ते | ८८.१३% |
| ८) | भक्ति वझलकर | ८७.७३% |
| ९) | अनिरुद्ध यार्दी | ८७.६०% |
| १०) | उन्मेष पवार | ८६.९३% |

शालांत परीक्षेतील यशा बद्दल मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर व सर्व शिक्षक वर्गाचे 'दिशा' तर्फे अभिनंदन !

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)**

☆ दि. १३ जून २००० रोजी शाळा सुरु झाली. हा दिवस उजाडला तो काहीशी दुःखाची किनार घेऊन. १२ जून या दिवशी महाराष्ट्राचे लाडके अष्टपैलू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांना व शाळेच्या माजी शिक्षिका श्रीमती. शशिकला जोशी यांना श्रद्धांजली वाहून शालेय कामकाजाला सुरुवात झाली.

☆ मे महिन्याच्या सुटीत दि. २ मे २००० ते ६ मे २००० या कालावधीत जि.प. कन्याशाळेत कलाशिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. त्यासाठी आपल्या शाळेतील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर शिबिरार्थी व अतिथी व्याख्यात्या म्हणून उपस्थित होत्या.

☆ जि.प. ठाणे आयोजित संगणक प्रशिक्षण शिबिरात आपल्या शाळेतील कु. साधना कारंडे व सौ. नेत्रा सोनवणे सहभागी झाल्या होत्या.

☆ दि. १४ जून रोजी माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला. शाळेचा एकूण निकाल ८८% इतका लागला. विशेष योग्यता श्रेणी प्राप्त विद्यार्थी ३६, प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी ७२, द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी ९३, तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी २७.

☆ शिवराज्याभिषेक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या सायकल स्पर्धेत आपल्या शाळेतील विद्यार्थिनी मोनिका कांबळी (१०अ) ही मुलींमधे सर्वप्रथम, कुमार शशांक केतकर (१०ब) हा १० ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये सर्वप्रथम व एकूण ११० मुलांमधे तृतीय क्रमांकावर चमकला. त्याला प्रमाणपत्र व पारितोषिक प्राप्त झाले.

☆ जेकब मेमोरियल ट्रॉफीसाठी १६ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेटच्या स्पर्धा निर्मलनगर मुलुंड येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत आपल्या शाळेतील सौरभ जोशी (१०ब) यास सर्वोत्तम खेळाडू व सर्वोत्तम क्षेत्ररक्षक अशी पारितोषिके प्राप्त झाली.

☆ कळवा येथे घेण्यात आलेल्या जलतरण स्पर्धेत कु. शशांक केतकर (१०ब) यास १०० मी. बॅकस्ट्रोक व २०० मी. इंडिव्हिज्युअल मिडले या दोन्ही प्रकारात ब्रॉझ पदक प्राप्त झाले. सदर स्पर्धा सीमेन्स कंपनीने अयोजित केली होती.

☆ कलानिकेतन चाइल्ड आर्ट इन्स्टिट्यूट आयोजित चित्रकला स्पर्धेत कु. स्मृती सूर्यकांत ढवळे (९ब) हिला कलागौरव पुरस्काराने प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह प्राप्त झाले.

☆ दि. २५ जून २००० रोजी गडकरी रंगायतन येथे 'हसा मुलांनो हसा' हा बालगीतांचा कार्यक्रम झाला. यात आपल्या शाळेतील विराज दामले (५अ), दिप्ती साने

आयुष्यात आपणच आपल्या खटल्याचे न्यायाधीश होऊ नका.

(७ब), मनाली दुखंडे (८ब) हे विद्यार्थी सहभागी होते.

४ डॉ. बेडेकर विद्यामंदिर माध्यमिक विभागातील खालील ६ विद्यार्थ्यांना महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत उज्वल यश मिळाले आहे.

१) **सुयोग संजीव मपारा** - राज्य शिष्यवृत्ती राज्यात ११वा क्रमांक

२) **उर्मिला बाबासाहेब शिंदे**-राज्य शिष्यवृत्ती - राज्यात १४वा क्रमांक

३) **भूषण श्रीपाद बर्वे** -राज्य शिष्यवृत्ती - राज्यात २३ वा क्रमांक

४) **गिरीश शिवाजी सोंडुलकर**-राज्य शिष्यवृत्ती - राज्यात २७ वा क्रमांक


५) **रीमा प्रवीण मेंगळे**-जिल्हा शिष्यवृत्ती - जिल्ह्यात ५वी.

६) **हर्षदा प्रकाश म्हात्रे** - उत्तेजनार्थ

त्यांना मुलाखतीसाठी सौ. अपर्णा भट व सौ. अंजली पंडित यांचे मार्गदर्शन लाभले.

**बांदोडकर महाविद्यालयातून प्रवीण बांदे बारावीत सर्वप्रथम :-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-२००० मध्ये घेतलेल्या इ. १२वीच्या परीक्षेत बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा उच्च माध्यमिक (बारावी) परीक्षेचा निकाल ९४.७५ टक्के इतका लागला असून प्रवीण पी. बांदे हा विद्यार्थी ६०० पैकी ५३७ गुण (८९.५० टक्के) मिळवून महाविद्यालयातून सर्वप्रथम आला आहे. त्याला जीवशास्त्र विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत.



**प्रविण बांदे**

प्रवीण बांदे याचे माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण वज्रेश्वरी येथे झाले असून आपल्या यशाचे श्रेय कॉलेजचे प्राचार्य श्री. सी.जी. पाटील, उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित, मार्गदर्शन करणारे सर्व प्राध्यापक तसेच आपले काका भास्कर बांदे व काकी सौ. आशा बांदे यांनी दिलेल्या प्रेरणेमुळे हे सर्व यश शक्य झाले असे सांगतो. या यशात प्रा. भंडारे सर यांचाही मोठा वाटा आहे असे त्याने सांगितले.

पुढे त्याचा वैद्यकीय शिक्षण घेण्याचा मानस आहे. पीसीबी ग्रुपला ९८ टक्के तर पीसीएम ग्रुपला ९५ टक्के असे गुण प्राप्त झाले आहेत. त्याला चित्रकलेचीही आवड आहे.

महाविद्यालयातून द्वितीय क्रमांकाने प्राची चिवटे (८८.०८ टक्के) तर तृतीय क्रमांकाने सौरभ पैठणे (८८.३ टक्के) हे उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेस बसलेल्या ४०० विद्यार्थ्यांपैकी ३७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यात विशेष प्राविण्यासह १०५ विद्यार्थी, १४८ विद्यार्थी प्रथम, ११५ विद्यार्थी द्वितीय तर ११ विद्यार्थी तृतीय वर्गात उत्तीर्ण झाले आहेत.

प्राची चिवटे व मयुरेश जोशी यांना पदार्थ विज्ञानात १०० पैकी १०० गुण तर गणितात अभिषेक शिंदे यास १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्राचार्य सी.जी. पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मकरंद दीक्षित, पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी

हार्दिक अभिनंदन केले आहे.

**बॅडमिंटनपटू हिमांशु ठक्करने सुशांत चिपलकट्टी स्मृती अखिल भारतीय ज्युनियर स्पर्धा जिंकली !**

ठाण्याचा सर्वोत्कृष्ट ज्युनियर बॅडमिंटन पटू व ठाणे महापालिकेच्या सय्यद मोदी स्मृती बॅडमिंटन प्रशिक्षण योजनेचा प्रशिक्षणार्थी हिमांशु ठक्कर याने पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या सुशांत चिपलकट्टी अखिल भारतीय ज्युनियर बॅडमिंटन स्पर्धेमध्ये ज्युनियर मुलांच्या एकेरीचे अजिंक्यपद मिळवले आहे.

१८ वर्षीय हिमांशुच्या खेळाचे वैशिष्ट्य आहे ते संयमी रॅलीजचा वापर, उत्तम पदलालित्य, उत्कृष्ट फीटनेस व चतुरस्त्र स्ट्रोक्स ! ६ फूट उंचीचा हा सडपातळ खेळाडू अगदी प्रथमपासून ठाण्यामधे दादोजी कोंडदेव प्रेक्षागृहात बॅडमिंटनचा सराव व प्रशिक्षण घेत असून श्री. श्रीकांत वाड व श्री. संजीव गणपुले हे त्याचे प्रशिक्षक आहेत. पुण्याच्या डब्लू. आय.ई. स्पोर्टस् कॉम्प्लेक्स मधे झालेल्या ह्या हंगामातल्या ह्या पहिल्याच व प्रतिष्ठापूर्ण स्पर्धेमधे संपूर्ण देशामधील पाचशेहूनही अधिक बॅडमिंटनपटूंनी भाग घेतला होता.

हिमांशु ठक्करने या स्पर्धेला उपांत्यपूर्व फेरीतच सनसनाटी सुरुवात केली. आठवे मानांकन लाभलेल्या ह्या ठाणेकर खेळाडूने प्रथम सिडेड एअर इंडियाच्या ए. प्रीथीवीचा १४-१७, १५-३, १५-६ असा पराभव केला. त्यानंतर उपांत्य फेरीत त्याने केरळच्या डी. साजीद याचा १५-१०, १५-८ असा सरळ दसटस मधे पाडाव केला. अंतिम फेरीत त्याची गाठ पडली ती द्वितीय सीडेड कर्नाटकच्या बी.पी.एल. प्रकाश पादुकोण ॲकेडमीच्या अनुप श्रीधरशी ! त्याचा १५-११, १५-२ असा सहज पराभव करून त्याने अजिंक्यपद पटकावले !

हिमांशुचे हे यश ठाणेकर खेळाडूंसाठी स्फूर्तिदायक असून ठाणे शहर व जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन व सय्यद मोदी बॅडमिंटन प्रशिक्षण योजना यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फळ आहे. अशी प्रतिक्रिया संघटनेचे अध्यक्ष खासदार प्रकाश परांजपे यांनी व्यक्त केली. हिमांशु व इतर ठाणेकर बॅडमिंटनपटूंचे अभिनंदन करताना पुढे म्हणाले की ठाण्याच्या क्रीडाक्षेत्रातील या बॅडमिंटनपटूंचे यश हेच दर्शवते की शिस्तबद्ध प्रशिक्षण कार्यक्रमाचा उपयोग खेळाडूंची प्रगती साधण्यासाठी उत्तम प्रकारे होऊ शकतो.

**अक्षय ठक्करची निवड ज्युनियर भारतीय बॅडमिंटन संघात !**

हिमांशु ठक्करचा धाकटा भाऊ अक्षय ठक्कर याचीही पुण्याच्या ह्या स्पर्धेत कामगिरी उत्तम झाली. दुहेरीवर आपले लक्ष जास्त केंद्रीत करणाऱ्या साडेसोळा वर्षांच्या अक्षयने महाराष्ट्राच्या निषाद द्रविडच्या साक्षीने ज्युनियर मुलांच्या दुहेरीच्या गटात उपांत्य फेरी गाठली व ते पराभूत झाले ते अमर मोहिते-अजित फाटक या जोडीकडून. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात क्योटो-जपान येथे होणाऱ्या ज्युनियर आशियाई स्पर्धेसाठी जाणाऱ्या भारतीय बॅडमिंटन संघात त्याची निवड झाली आहे. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर निवडला जाणारा तो सहावा ठाणेकर बॅडमिंटनपटू ! ठाणे महापालिकेच्या सय्यद मोदी प्रशिक्षण योजनेचा प्रशिक्षार्थी असणारा अक्षय हा गेली सहा वर्षे ठाण्यात कसून मेहनत करतो आहे.

हिमांशु व अक्षय हे ठक्कर बंधू ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या कॉमर्स शाखेचे विद्यार्थी असून त्यांच्या कॉलेजचा व विशेषतः प्राचार्य श्री.स.वा. गोखले यांचा सतत लाभणारा उत्तेजनाचा या यशात मोठाच सहभाग असल्याचे हे दोघेही बॅडमिंटनपटू मान्य करतात.

विद्याप्रसारक मंडळाच्या कार्यालयातील श्री. राजेश राणे यांची एकता कल्चरल अकादमीतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत उत्कृष्ट अभिनयाच्या प्रथम पारितोषिकासाठी निवड करण्यात आली. विक्रम वाटवे

लिखित 'चंद्रपूरच्या जंगलात' या नाटकातील अभिनयाबद्दल ही निवड झाली. परीक्षक म्हणून जयंत पवार, रामविजय परब, अवधूत भिसे यांनी काम पाहिले.



**पुरस्कार स्वीकारताना श्री. राजेश राणे**

यापूर्वीही श्री. राणे यांना नाटक व काव्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल अनेक पुरस्कार मिळाले.

**प्राजक्ता सारंग विज्ञान शाखेत विद्यापीठात सर्वप्रथम**

बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील तृतीय वर्ष पदवी या वर्गात शिकणारी कु. प्राजक्ता सारंग बी.एस.सी.च्या एप्रिल २००० मध्ये झालेल्या विद्यापीठाच्या परीक्षेत ८९.८८% गुण मिळवून मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम आली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील, पदवी विभागाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित यांनी कु. प्राजक्ताचे विशेष अभिनंदन केले आहे.

प्राजक्ताचे वडील डॉ. सी.म. सारंग महाविद्यालयाच्या रसायन शास्त्र विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक असून विभागप्रमुख आहेत. रसायन शास्त्राची प्रेरणा आपले वडील व आपली मोठी बहीण कु. प्रतिभा यांच्याकडून आपण घेतली. त्यांचे मार्गदर्शन व आईचे प्रोत्साहन यामुळे आपल्याला हे यश मिळाले अशी भावना तिने व्यक्त केली. शिवाय महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. पाटील सर, कनिष्ठ महाविद्यालयातील सिंग सर व पदवी महाविद्यालयातील डॉ. उल्हास पंडित या सर्वांच्या मार्गदर्शनाचाही तिने आवर्जून उल्लेख केला.



**प्राजक्ता सारंग**

प्राजक्ताचे शालेय शिक्षण सरस्वती मराठी शाळेतून झाले १०वीत तिला ८९% तर बारावीत ७७% गुण मिळाले होते. आता आय्.आय्. टी. ची प्रवेश परीक्षा देण्याचा किंवा यु.डी.सी.टी. तून बी.टेक् करण्याचा तिचा मानस आहे. तिला हे यश नियमित अभ्यासामुळे मिळाले असेही तिने सांगितले.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातून विशिष्ट विषयात वा गुणवत्ता यादीत यापूर्वी अनेक विद्यार्थी आले होते, परंतु विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा मान महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीस प्रथमच मिळालेला आहे.

महाविद्यालयाचा एकूण निकाल ८५% लागला आहे. विषयवार प्रथम येणारे विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत १) **रसायन शाखा** - प्राजक्ता सारंग ८९.८८ % २) **पदार्थविज्ञान** - गोपी वीरावल्ली ८९.५% ३) **गणित** - भक्ती वैद्य ७२.१३% ४) **संख्याशास्त्र** - पूनम नाईक - ७३.१३% ५) **प्राणिशास्त्र** - चेरु सेरी ज्योथी ७५.४% ६) **वनस्पती शास्त्र**-सावा परुलेकर ७२.५%

• • •

---

दुःख हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे.